# माणूस

२१ डिसेंबर १९६८

मूल्य : चाळीस पैसे

## कुटुंबनियोजन नव्हे; कुटुंबकल्याण!



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : तिसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. डिसेंबर, १०

दि. ७ डिसेंबरच्या 'माणूस' अंकातील "झोपडपट्टीत महाविद्यालयीन विद्यार्थी" हा श्री. प्रमोद सवनीस यांचा लेख वाचला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या कार्याबद्दल आपुलकीचे शब्द लिहिल्याबद्दल धन्यवाद! परिषदेच्या कार्याची माहिती फक्त 'माणूस'च्या अंकात नेहमी वाचावयास मिळतेच. त्यामुळे समाधान वाटते.

मुखपृष्ठ–"हाटेबाजारे" एकदम उत्तम.

**दत्ता पाठक**, रत्नागिरी.

स. न. डिसेंबर, १२

दि. ७ डिसेंबरचा 'माणूस' वाचला. "खडकाचा शत्रू" आकर्षक व मनातील दुःख, दया यांचा कप्पा एकदम उघडणारी. ग्यानबाच्या गुऱ्हाळानं समाधान.

**दिलीप डिग्रजकर**, सांगली.

स. न. डिसेंबर, १३

वाचनीय व सडेतोड विचारांबद्दल 'माणूस'चा अभिमान वाटतो.

'दैनंदिन जीवन व महाविद्यालयीन शिक्षण' यावर एक टीकात्मक लेख इच्छितो.

**श्रीधर जोशी**, मुंबई.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# । शु । भं । क । रो । ति ।

होकार ऐकला तेव्हा आधी वाटले आपण स्वप्नात आहोत. मग वाटले की सगळ्या जगाला आपले भाग्य ओरडून सांगावे. त्यानंतर मनात आले, नाही, अजूनही खात्री नाही. आपला भूतकाळ हा असा; त्यात बापूंशी गाठ आहे. त्यांना हे नक्कीच मानवणार नाही. आणि कुणास ठाऊक 'त्या'च्या कानी काय काय जाईल ते. आपण काहीच लपवून ठेवलेले नाही; तरी पण कुणाकुणाची कल्पनाशक्ती आणि उत्साह तेज असतो. 'तो' तसा चांगला आहे पण माणूसच आहे. आणि पुरुष आहे. आपल्या वाग्दत्त वधूविषयी वेडेवाकडे ऐकणे त्याला कसे आवडेल ?

एकच खात्रीपूर्वक आत-आतून वाटत होते की तो खंबीर आहे. तो विचारी आहे. आणि आपल्याला होकार देण्यापूर्वी त्याने विचार केलेला आहे. त्याच्या होकारात नव्हाळीचा उल्हास नव्हता, शांत आत्मविश्वास होता. जे आपण पत्करत आहोत ते पेलून नेण्याइतकी ताकद आपल्यात आहे असे वाटल्यावाचून तो मुळी 'हो' म्हणणारच नाही. तो फसणार नाही, विचारपूर्वक एका बिकट परिस्थितीत पाऊल ठेवील आणि ते मागे नाही घेणार. हे असे आपल्याला वाटण्याजोगा 'त्या'चा आपला सहवासही तोवर नव्हता; पण त्याच्या 'हो'काराने हे इतके आपल्याला दिले होते. बाळपणापासून एका व्यवहारप्रधान, कष्टाच्या, नकारांच्या आणि अविरत धडपडीच्या खडतर आयुष्याने आणलेला शीण हलका करण्याला आता एकदाची आपल्याला हक्काची, सर्वस्वी आपली जागा लाभली आहे, हे मनाच्या मनात उमजले होते नि फार फार हलके वाटत होते—पण क्षणिकच.

पुन्हा जिवाला धास्ती वाटे, बापूंना कळले तर काय ? उषाचे स्वतःचे असे एखादे वेगळे जग ते खात्रीने टिकू देणार नाहीत. साऱ्या शक्तीनिशी ते त्यावर घाव घालतील आणि मग काही उरणार नाही. आयुष्यात मग काहीएक राहणार नाही, सारे काही संपेल.

आपण ठरवले की लाभलेले भाग्य उरीपोटी अगदी गुपचूप जपायचे. कुणाला म्हणून पत्ता लागू द्यायचा नाही. ओठांवाटे हर्षाचा एखादा शब्दही उमटू द्यायचा नाही. मुद्रेवर उत्साहाचा लवलेशही येऊ द्यायचा नाही. सारा अभिनय पणाला लावायचा आणि हाती आलेले सुंदर सत्य सांभाळायचे. बापूंना कळता नये म्हणजे आईलाही कळता कामा नये. आईला कळता कामा नये म्हणजे घरात कुणालाच

कळता कामा नये. आणि बाकी तर कोणी आपले नाहीच–फक्त फक्त 'तो' आपला आहे, आपला झाला आहे, विचारपूर्वक आणि शांतपणे झाला आहे.

मग एकच परिपाठ झाला. वरपांगी रूक्ष, कंटाळले राहायचे. मनात आशा-अपेक्षांचे उत्फुल्ल बहर जपायचे. स्वप्नात रमायचे पण व्यवहार आणि त्याबरोबर येणारे बापू क्षणभरही विसरायचे नाहीत. बेभान व्हायचे पण पाऊल चुकू म्हणून द्यायचे नाही. 'जशास तसे' मधली दोरीवरची कसरत आपण लीलया केली, ही नवी कसरत मात्र फार फार अवघड जात होती. आतले सुखाचे उमाळे आणि बाहेरचा रोकडा व्यवहार, आत अनावरपणे उमलणारी स्वप्नसृष्टी आणि बाहेर आवर्जून जगावे लागणारे एक दबले, शिस्तबद्ध, भावरहित आयुष्य यांच्या क्षणोक्षणी एकमेकांत मिसळणाऱ्या, एकमेकींवर आक्रमण करणाऱ्या सीमा सांभाळताना डोळ्यांत पाणी जमे. कंठी आवेग दाटत. ऊर दुभंगू पाही. पण हेही बाहेर उमटून मुळीच चालणार नसे. फार-फार कठीण होते. आयुष्याच्या अतिशय सुंदर अवस्थेत माणसाला आपले हे देवदुर्लभ वाटावे असे भाग्य जपण्यासाठी मृतवत आणि यंत्रासारखे राहावे लागावे, हे किती भयंकर असते, हे जे यातून गेले असतील त्यांनाच माहीत. हा अभिनय महाबिकट.

आपल्याला तो नीटसा जमलाही नाहीच !

उषाला नकळत हसूच येते.

समोर कोणी नसते. मुलाखत कधी संपली ? तो चष्म्याआडून डोकावणारा पत्रकार कधी गेला ? की तो आलाच नव्हता ? की हाही एक भूतकाळ आपल्यापर्यंत पोचून परत गेला ?

तिला नीटसे काहीच उमजत नाही, आठवत नाही. याचीही गंमत वाटते. कसला शोध घेण्याचा मुळीच उत्साह नसतो. मन ज्या अधांतरात पिसासारखे तरंगत असते तिथेच राहू इच्छिते.

"सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

याला कसली धर उरलेली नसते. ते एकसारखे वाहत असते—वाहत असते . . .


आपल्या वागण्याबोलण्यांतून, कडेकोड बंदोबस्तातूनदेखील आतल्या बहराच्या खुणा बाहेर ओसंडत होत्या आणि आपण आपल्या समजत होतो की सारे काही अगदी गुप्त आहे ! कुणाला काही कळत नाही !

आपल्यातला बदल आपले बारसे जेवलेल्या चाणाक्ष बापूंच्या नजरेत आला होता. त्यांची गफलत झाली ती एकच : त्यांना वाटले उषा अमिया चक्रवर्ति यांच्याबरोबर पळून जाण्याची शक्यता आहे. त्यांना आपल्यातला बदल कळला होता पण तपशील अज्ञातच राहिला होता. आपल्या आयुष्यावर सक्त नजर ठेवूनही काही गोष्टी बापूंच्या नजरेबाहेर घडल्या होत्या आणि ते हुशार शिकाऱ्याप्रमाणे पण चुकीचा माग घेत निघाले. 'तसले' काही आपण करू नये म्हणून सर्व प्रकारची खबरदारी घेऊ लागले. विवाहित पुरुषाबरोबर तरुण मुलीला सारे आयुष्य काढणे कसे अशक्य असते आणि त्यात तिचा कसा नाश घडतो याची संथा आपल्याला वेळी-अवेळी मिळू लागली. ज्याच्याबरोबर आपण पळून जाणार आहोत (असा बापूंचा समज) त्याच्याविषयी उणेअधिक ऐकावे लागू लागले. आपल्यावरचा पहाराही वाढला. मात्र विशिष्ट माणसालाच आपण भेटत नाही एवढ्यापुरता तो मर्यादित होता आणि आपल्या माणसाला आपण साऱ्या कडेकोट पहाऱ्याबाहेर जाऊन भेटत होतो.

बापूंनी एका जहागीरदाराबरोबर आपले लग्न ठरवून टाकले. कुठूनही पण उषा आपल्या हाती राहावी आणि ती हातची जाणारच असेल तर निदान तिच्यामुळे घरात आलेले वैभव घरातून जाता कामा नये याबद्दल त्यांचा कटाक्ष होता. घरात आता पैसा होता, सुखसोयी आल्या होत्या, दाराशी गाड्या होत्या. बापूंच्या लेखी हे सारे म्हणजे उषा होती आणि उषा म्हणजे फक्त हे एवढेच होती.

या काळातला पुण्याच्या एका हॉटेलातला सनसनाटी प्रसंग अजून आठवतो.

आपण शूटिंगसाठी पुण्यात गेलो की एका विशिष्ट हॉटेलात उतरत असू. तेवढ्या काळात तेच आपले घर असे. अशाच आपण पुण्यास गेलो. जाताना बरोबर मनोहर होते. दोघांनी मिळून जायचे असे आधीच गुप्तपणे ठरले होते. तिसऱ्या कुणालाही कल्पना देण्यात आली नव्हती. विशिष्ट ठिकाणी गाडीत मनोहर आले. त्यांचे आई-वडील पुण्याला होते आणि आमच्या लग्नाविषयी मनोहरना त्यांची संमती मिळवायची होती. म्हणून मनोहर त्यांच्या घरीच जाणार होते. हॉटेलात आपण एकट्याच उतरलो. पण मुंबईस बापूंना सुगावा लागला की उषा आणखी कुणाबरोबर तरी



१९६५ । मुक्काम अमेरिका । टी. व्ही. मुलाखत

हॉटेलात उतरली असून तिथूनच ती पळून जाण्याचा संभव आहे. त्यांनी पुण्यातल्या आपल्या बहिणीकडे आणि आत्याकडे हे कळवले. आपली विशुद्ध जिव्हाळयाने चिंता वाहणाऱ्या या दोघींचे यजमान आणि खुद्द त्या तातडीने हॉटेलवर येऊन हजर झाले. हे सारे आपल्याला अनपेक्षित होते आणि आपण एकटयाच सापडू हे त्यांना अनपेक्षित होते. आपल्याबरोबर दुसरे कोणी उतरलेले नाही हे पाहून त्यांना बरे वाटले आणि संशयही वाढला. सर्वांनी तसेच निघून आपापल्या घरी चलण्याची गळ आपल्याला घातली. आपण असे करण्याचे नाकारले; तरी पण ते टाळणेही शक्य नव्हते. त्याने संशय आणखीच वाढला असता.

यातच एक गंमत झाली होती. (आता ती गंमत वाटते ! तेव्हा ?) मनोहर हॉटेलवर येणार होते. घरी काय होते ते कळवणार होते. ते येणार त्याच सुमारास नातेवाईकांचा हा ' छापा ' आपल्या खोलीवर पडला. नशीब आपले, तो जरा उशिरा पडला नाही. एरवी मुद्देमालासकट आपण सापडलो असतो ! खोलीत सगळे जमले होते आणि आपल्यावर परोपरीने दडपण आणीत होते की, आपण हॉटेल सोडून घरी यावे; आणि आपल्या काळजात धडधडत होते, या क्षणी मनोहर हजर झाले तर? सगळेच गुपित उघडे होणार, रहस्य फुटणार आणि मुख्य म्हणजे ते बापूंना कळणार! मग बघायलाच नको ! तेवढे होऊ नये. होऊ देता कामा नये. काय वाटेल ते करून हा गोंधळ टाळला पाहिजे. मनोहरना येथून दूर ठेवले पाहिजे.

फोनवरही ते भेटण्यासारखे नव्हते. कोणत्याही क्षणी ते येऊन पोचणार होते. उडालेला गोंधळ लपवीत आपण निमूट आवराआवर करू लागलो. सर्वांच्या दडपणापुढे मान तुकवणे भागच होते. त्याच वेळी डोक्यात विचारचक्र गरगरत होते, मनोहरना हे कसे कळवावे ? ते इकडेच येत असतील तर त्यांना कसे अडवावे ? एकदा वाटे, ते वाटेवरच असतील. मग वाटे, ते गेटशी येऊन पोचले असतील. पुन्हा वाटे, जिना चढत असतील. दार वाजले की, ऊर धडाडून बंद पडते की काय असे होई. पुन्हा मुद्रेवर यांतले काही नाही. येऊन चालणारच नव्हते.

आपण काय केले ? आवराआवरीच्याच लगबगीत खोलीबाहेर सटकलो. हॉटेलच्या नोकराला काहीतरी मिषाने गाठले. ते सारे आपल्या चांगले माहितीचे आणि विश्वासाचे होते. आपण एक चिठ्ठी खरडून दिली, परत जा, नंतर भेटू. नोकराला सांगितले, डोळ्यांत तेल घालून गेटशी नजर ठेव. साहेब आले की, चिठ्ठी बाहेरच्या बाहेर, गुपचूप दाखव. त्यांना वर येऊ देऊ नकोस. नोकर मान हलवून मिष्किल हसला.

नशीब जोरावर होते. मनोहर बाहेरल्या बाहेरच परत गेले. आपण हॉटेलातून उचलून आपला मुक्काम गावात नातेवाईकांच्या घरी टाकला. त्यांना वाटले, एका मोठ्या मूर्खपणापासून, अविचारापासून, धोक्यापासून उषाला वाचवले. हा धोका किती मनोहर होता, हे त्यांना काय ठाऊक ?

उषा अंग अंग सुखावते. सुखासीन उसासा टाकते. तिला वाटते की 'होणारे न चुके' या सुभाषिताला काही चांगले अर्थही असतात आणि ते त्याच्या अनेक यातनादायक, दुःखद, छळवादी प्रत्यंतरांच्या जखमा पाहता पाहता बुजवून टाकतात. म्हणजे त्या जखमा नाहीशा होत नाहीत; पण सुसह्य होतात. राहून जातात ते कधी मधी वेदनेने झरत राहणारे व्रण आणि या वेदनेला सामावून घेणारे, आपल्याला सदैव वेढून राहणारे एकच एक सुख. वेदनेशिवाय, खडतर जगण्याशिवाय या सुखाला चव नाही. जणू पहिल्याचा पुरेपूर मोबदला भरूनच दुसरे मिळवावे लागते आणि म्हणूनच त्याची अपूर्वाई असते.

एक दिवशी आईन एकटेपणी विषय काढला.

उषा, हे म्हणतात तू कोणाबरोबर तरी पळून जाणार. खरे का ? मग तुझे कसे होईल ?



**१९६५ । डॉ. मनोहर, उषाबाई आणि त्यांचे अमेरिकन सहकारी**

आपण स्पष्ट उत्तर देणे टाळले. आपण म्हणालो, आई, अविचाराने मी काहीही करणार नाही एवढे नक्की समज.

पण मग तुझे कोणाशी जमले आहे का ?

आपण उत्तर केले नाही.

कोणाशी जमले आहे ? कोण आहे तो ?

ओठांशी उत्तर आले. तो तर आईच्या माहितीचाच होता. तिला आवडण्याजोगा होता. कुणालाही आवडण्याजोगा होता. कुणीही अभिमान बाळगावा असाच होता. आपल्याला तर त्याचा ज्वलंत अभिमान वाटत होता. शिवाय आपल्या घरी येणारा जाणारा, ज्याचा घरोबा आपल्या आजोबांपासूनचा होता, असा होता. काय म्हणून त्याचे नाव लपवून ठेवायचे ?

पण लगेच मन म्हणाले, सावध ! त्यांचे नाव आईला कळले, की बापूंपर्यंत ते जाण्याला वेळ नाही. मग काय घडेल त्याचा विचार कर !

आपण नाव सांगण्याचे टाळले पण हे फार दिवस जमले नाही. आईने आपल्याला विश्वासात घेतले. प्रेमाची धमकीही दिली. आपण दुबळया झालो आणि नाव बोललो. आईला खूप आनंद झाला. तिच्या मनातल्या शंका कुशंका पळाल्या. तिचा भावडा, वत्सल जीव भांड्यात पडला आणि बापूंना काही न सांगण्याचे वचन तिने दिले.

पण बापू मागावर होतेच. ते आता फार अस्वस्थ, बेचैन असत. आपण कधी काय करीत असू याचाच विचार आणि चिंता ते करीत. हातचे भाग्य हातून सटकणार याची खूण जणू त्यांना आगाऊ कळली होती आणि याने त्यांची झोप उडवली होती, अन्न बेचव करून टाकले होते. आपण घरी येत असू तेव्हा ते बहुधा


तुमच्या सर्दीसाठीं जरूर आहे
रबेक्स
सर्दीवर तीव्र परिणाम करणारा, पण सौम्य इलाज
Rubex
Rubex
रबेक्स
Rubex
अलेम्बिकच्या होम्प्रो विभागाचे उत्पादन
everest/346/ACW mr

सज्जात फऱ्या घालीत असत. रात्री अपरात्रीही त्यांचे हेच चाले. आपण पोचलो की त्यांची नजर आपल्यावरून फिरे. तिच्यात विलक्षण संशय आणि एक भय भासे. त्यांच्या शब्दाशब्दांत राग उमटे. पण हडसून खडसून विचारण्याची त्यांची तयारी नव्हती. कदाचित् यानेच सारे विकोपाला जाईल आणि जे उद्या व्हायचे ते आजच घडेल असे त्यांना वाटत असावे.

आपल्याला आता बापूंसमोर जाताना जुने भय आणि दडपण वाटेनासे झाले होते. जे वाटे ते केवळ वर्षानुवर्षांच्या सवयीने. त्याआत समजत असे की आता या माणसावर आपण विसंबून नाहीत. याने काहीही केले तरी आपल्याला आपला आधार कुठे तरी आहे. तो आपला — अगदी सर्वस्वी आपला हक्काचा आहे. आपण मनोमन त्या आधारावर विसंबून, बिनघोर होऊन बापूंना सामोऱ्या जात असू. आणि मध्येच केव्हातरी, कुठे तरी अचानक पोटात भीतीचा भला मोठा गोळा उठे. बापूंना नाव कळले तर ? काय करतील ते ? काय काय करतील ?

बापूंना नाव कळले. आईकडून त्यांनी ते काढून घेतले. आईचेही मन फिरले. ती बापूंना सामील झाली.

घर आपल्याला पुरते परके झाले.

एक दिवशी एका चित्रपटाच्या प्रीमिअरहून आपण मध्यरात्री घरी पोचलो. आपल्याला दीराने आपल्या घरी सोडले. आपण घरात शिरेपर्यंत तो अशावेळी खालीच थांबे आणि मग निघून जाई तसा तो खाली काळोखात थांबला.

रात्रीचा काहीतरी सव्वा वाजत होता.

बापू सज्जातच उभे होते. आपल्याला पाहून त्यांचा तोल गेला. त्यांनी आपल्याला घरात घेण्याचेच नाकारले. आपल्यावर आणि मनोहरवर अद्वातद्वा तोंड टाकले.

वर चाललेली ही बाचाबाची ऐकून खाली उभ्या असलेल्या दीराला कळले की काही गडबड आहे. तो वर आला. बापूंना क्रोध अनावर झाला होता. त्यांच्या सर्वांगाची नुसती तलखी होत होती. दीराला ते म्हणाले, खाली उडी घेऊन जीव देण्याच्याच विचारात मी आता होतो. हिचे हे जे काही चालले आहे हे मला साफ नापसंत आहे. घराण्यालाही काळिमा फासणार आहे. तुम्ही सारे तिला सामील आहात. एवढे तुम्हांला तिच्याविषयी वाटते तर न्या तिला तुमच्याकडेच. मी काही तिला आज घरात घेणार नाही.

हे सारे तसे उघडचावर, त्या निवांत वेळी घडावे हे फार वाईट होते. याला तमाशाचे स्वरूप येत होते. पण बापू पुरते बेभान झालेले होते. दीर अत्यंत शांत स्वरात म्हणाले, हे पाहा, मुलीला आम्ही नेऊच—पण रीतसर तिचं लग्न लावून मग. तोवर तुम्ही तिला तुमच्याकडे ठेवा.

कसेबसे घराचे दार आपल्यासाठी त्या रात्री उघडले; पण नंतर आठच दिवसांत पुन्हा कायमचे बाहेर पडण्यासाठीच. (क्रमशः)



# किल्ले रायगड

शरद गोखले

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचा मानबिंदू. महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेण्यासाठी भल्याभल्यांनी आपली लेखणी, वाणी झिजवली. नाटय, चित्रपट, ग्रंथ, काव्य अशा विविध माध्यमांतून

महाराजांची थोरवी अनेक लहान-थोरांनी यथाशक्ती कथन केली आणि छत्रपतींवर अपरंपार प्रेम करणाऱ्या मराठी मनाने प्रत्येक वेळी नवीन उत्साहाने अशा प्रयत्नांचे स्वागत केले.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, दिग्दर्शक माधव शिंदे आणि त्यांचे सहकारी यांनी तयार केलेला "किल्ले रायगड" हा अनुबोधपट हा असाच एक नवीन उपक्रम. 'घरची राणी' हा नवीन मराठी चित्रपट पाहण्यासाठी गेलो असताना अगदी अनपेक्षितपणे हा जिवंत अनुबोधपट पाहण्याचा योग आला आणि अनुबोधपटानेच मनाची अशी विलक्षण पकड घेतली की, 'घरची राणी'चे साचेबंद सेन्सॉर परवाना-पत्र पडद्यावर येईपर्यंत आपण हा चित्रपट पाहण्यासाठी आलो आहोत, याचा विसर पडला.

अनुबोधपटाचा विषय आहे, महाराजांची राजधानी असलेला "किल्ले रायगड." राजधानी म्हटले की, राजाचा प्रभाव आलाच. छत्रपतींनी याच गडाची निवड का केली, येथपासून सुरुवात करून गडाचे अनेक बारकावे नोंदवत, गडाशी एकजीव झालेल्या कथांचा मागोवा घेत, गडाची वैशिष्ट्ये हळुवारपणे उलगडून दाखविली आहेत. निसर्गसौंदर्याने नटलेला रायगडचा परिसर आणि आज तीनशे वर्षांनंतरही मराठी मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या त्या थोर लोकांच्या राजाच्या लोकविलक्षण कथा पडद्यावर पाहताना मराठी माणूस आजही हरखून जातो, याचा प्रत्यय हा अनुबोधपट पाहताना आला.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, दिग्दर्शक माधव शिंदे, छाया-लेखक वसंत शिंदे आणि त्यांचे अन्य सहकारी यांना या अनुबोधपटाच्या यशस्वितेचे श्रेय द्यावे लागेल.

दीर्घकाळ पडद्यापासून दूर असलेले कसबी दिग्दर्शक माधव शिंदे या अनुबोध-पटाच्या निमित्ताने पुन्हा रुपेरी पडद्यावर झळकताना दिसले. रायगडाची ही रुपेरी कथा त्यांनी मोठ्या खुबीने सांगितली आहे. आपल्या विषयाला उठाव देतील अशाच जागा त्यांनी चित्रीकरणासाठी वापरल्या आहेत. आणि निवेदनातील आशयाची खुलावट करतील अशा सुंदर अँगल्सनी रायगडावरील दृश्ये चित्रीत केली आहेत. वानगीदाखल हिरकणी बुरूज आणि राष्ट्रद्रोह्यांच्या कडेलोटासाठी त्या काळी वापरण्यात येणारा बुरूज यांच्या चित्रीकरणाचा उल्लेख करावा लागेल. तथापि अनुबोध-पटाला खरा जिवंतपणा दिला आहे, तो त्यासाठी वापरण्यात आलेल्या सुंदर पेंटिंग्जनी; ही पेंटिंग्ज चितारणाऱ्या कलावंतांचे जेवढे कौतुक, तितकेच त्यांचा खुबीदार वापर करणाऱ्या माधवरावांचेही करावे लागेल. छत्रपतींचे देहावसान,

त्यांच्या वाघ्या नामक कुत्र्याचे आत्मबलिदान, गडावरील बाजाराची दृश्ये, काळजाच थरकाप उडवणाऱ्या कडेलोटाची कारवाई, महाराजांकडून हिरकणीचे झालेले कौतुक, या सर्व घटनांत चैतन्य आले आहे, ते या प्रभावी पेंटिंग्जमुळे आणि प्रभावी निवेदनामुळे. महाराजांचे रायगडावरील आगमन आणि त्यांचा राज्याभिषेक या विशेष महत्त्वाच्या घटनांसाठी प्रत्यक्ष कलाकारांचा वापर करून या प्रसंगांना न्याय दिला आहे. अनुबोधपटनिर्मितीशी गुंतलेल्या मंडळींना कदाचित हे रुचणार नाही. तथापि कलाकारांच्या भूमिकांमुळे भासणाऱ्या वास्तवतेवर प्रेक्षक संतुष्ट होतो.

या रायगडासाठी कलम चालवले आहे बाबासाहेब पुरंदरे यांनी. साहेबांचा या विषयावरील अभ्यास आणि व्यासंग सर्वज्ञात आहे. त्यांच्या कसबी लेखणीतून उतरलेले धावते वर्णन म्हणजे या अनुबोधपटाचा आत्मा आहे. अनुबोधपटाच्या मूळ विषयाशी प्रामाणिक राहून त्याच्या दृश्यभागांची रंगत वाढण्यासाठी किती आणि कसे लिहावे, याचा नमुना म्हणून त्यांच्या या कामगिरीचा उल्लेख करावा लागेल. लेखनाबरोबरच प्रत्यक्ष निवेदन करण्याची कामगिरी त्यांनी त्यांच्या " खास पद्धती "ने बजावली आहे.

अनुबोधपटाचे रसग्रहण संपवण्यापूर्वी आवर्जून उल्लेख केला पाहिजे, तो वसंत शिंदे यांच्या कामगिरीचा. छाया-लेखक म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. रायगडाच्या राजशाही वैभवाला साजेशा पद्धतीने त्यांनी रायगड प्रेक्षकांना दाखवला आहे. त्यांच्या कॅमेऱ्याने अनेक बारकाव्यांची सुरेख नोंद घेतली आहे.

काही निवडक अपवाद वगळता शासकीय पातळीवरून तयार करण्यात आलेल्या रटाळ, साचेबंद अनुबोधपटांपेक्षा याचे स्वरूप वेगळे आहे. एका वेगळ्या निष्ठेने आणि जिद्दीने या अनुबोधपटाची निर्मिती झाली आहे. शासनाने याची दखल घ्यावी आणि फिल्म्स डिव्हिजनमार्फत संपूर्ण देशभर या बोधपटाचे वितरण करावे, असे येथे सुचवावेसे वाटते.



मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# डडले आणि स्टुअर्ट

गेल्या आठवड्यात दोन महत्त्वाच्या परराष्ट्रीय व्यक्तींनी भारताला भेट दिली· पहिले श्री. डडले सेनानायके, सिलोनचे प्रधानमंत्री व दुसरे, ब्रिटनच्या परराष्ट्र आणि कॉमनवेल्थविषयक खात्याचे सचिव श्री. स्टुअर्ट ! लंका आणि ब्रिटन ह्या दोन्ही राष्ट्रांचे भारताशी परंपरागत संबंध आहेत. लंकेचे संबंध तर जवळ जवळ वेदकालापासूनचे आहेत आणि लंका–भारत संबंधात काही अंशी सांस्कृतिक, भावनिक लागेबांधे आहेत· पुरातन काळात रावणापूर्वीसुद्धा, लंकेत वेदांचे पठण नियमित होत असल्याचे सांगितले जाते. भगवान बुद्धांनी स्थापिलेल्या बौद्ध धर्माला सिंहली लोकांनी बुद्धाच्या मायभूमीतील जनतेपेक्षाही अधिक चांगल्याप्रकारे हात दिला. अर्वाचीन काळात दोन्ही राष्ट्रे ब्रिटनच्या गुलामगिरीत होती आणि ब्रिटिश चहा मळेवाल्यांनी, स्वहितार्थ असंख्य तामिळी लोकांना सिलोनमध्ये नेले होते; यामुळे सिंहली संस्कृतीवर तामिळी संस्कृतीचा बराच प्रभाव पडला असणे साहजिक आहे. चहाचे मळे, राहणीमान, संस्कृतींमधले साम्य वगैरे अनेक साधर्म्यामुळे सिलोन आणि भारत ह्यांच्यातील संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे, मित्रत्वाचे असायला हवेत. ते तसे असावेत, अशीच उभय राष्ट्रप्रमुखांची भावना आहे, असे निदान त्यांनी काढलेल्या संयुक्त पत्रकातून तरी दिसते. कच्छतिवू बेट, सिलोनी नागरिकत्व नसलेले जवळजवळ पाच लक्ष भारतीय वगैरे काही प्रश्नांवर सिलोन व भारत ह्यांच्या दरम्यान काही मतभेद आहेत; परंतु ह्या विविध प्रश्नांचा ओझरता उल्लेख करून व ह्या प्रश्नांवर विचारविनिमयाद्वारे मार्ग शोधून काढायचे मान्य करून, ह्या पत्रकात, औद्योगिक–सांस्कृतिक क्षेत्रात परस्पर सहकार्य, चहानिर्यात धोरणात एकसूत्रता, वगैरे परस्पर हितसंबंधांच्या प्रश्नांना महत्त्वाचे स्थान मिळाले आहे ही खरोखरच आनंदाची घटना आहे. त्याचबरोबर, सिलोनी नागरिकत्व नसलेल्या व भारतात परतू इच्छिणाऱ्या भारतीयांना ७५ हजार सिलोनी रुपये (भारतीय चलनात जवळ जवळ एक लाख रुपये) कुठल्याही परकी चलनविषयक नियमांच्या अडथळ्याशिवाय, आपल्याबरोबर नेता येतील ही घोषणा करून श्री. सेनानायके यांनी लंका–भारत संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊलच टाकले आहे· १९६४ च्या शास्त्री–सिरिमाओ करारानुसार, भारतात परतू इच्छिणाऱ्यांना

वरील नियम हा एक मोठा अडथळा होता. वरील नियमांनुसार ४४ टक्के रक्कम अशा नागरिकांना लंका सरकारला द्यावी लागे. श्री. डड्लेंच्या वरील घोषणेने ह्या प्रश्नाची उकल व्हायच्या दृष्टीने भरीव मदत होईल !

पंडितजींच्या कारकीर्दीत, आशियातल्या आमच्या शेजाऱ्यांबरोबरच्या संबंधांकडे आम्ही फारसे लक्ष दिलेच नव्हते. ब्रिटन, अमेरिका, रशिया आणि चीन ह्या बड्या राष्ट्रांकडेच भारताने आपले सारे लक्ष केंद्रित केले होते. अंगच्याच असलेल्या मोठेपणामुळ आशियाचे नेतृत्व करण्याच्या दृष्टीने भारताची पावले प्रथमपासून पडायला हवी होती. आशियायी राष्ट्रांच्या समान समस्यांवर–आणि त्या तशा खूप आहेत; खल करून, त्या सोडवण्याच्या दृष्टीने तोडगे शोधून काढणे, काही समान आर्थिक घोरणे आखणे वगैरे बाबतींत भारताला पुढाकार घेता आला असता व कै. नेहरूंच्या लोकोत्तर प्रतिमेमुळे नेतृत्व भारताकडे चालून येऊन, भारताची प्रतिमा अधिक उंचावली असती; कदाचित् यामुळे आजच्या वैचारिक, तांत्रिक, आर्थिक बाबतींतील पाश्चात्य परावलंबित्वाची पाळीही भारतावर आली नसती. परंतु त्या वेळी आम्ही स्वप्नरंजनात मश्गुल होतो. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतर आमच्या स्वप्नभंजनास सुरुवात झाली व १९६५ च्या पाकिस्तानी आक्रमणानंतर आम्हांला वास्तवतेची खरीखुरी जाण आली. कै. शास्त्रींच्या काळातच मलेशिया, सिंगापूर, ब्रह्मदेश, सिलोन, नेपाळ वगैरे आमच्या छोटया छोटया शेजाऱ्यांबरोबर अधिक घनिष्ठ संबंध निर्माण होण्यास सुरुवात झाली. आज हे संबंध अधिक घनिष्ठ व्हायला हवेत. विशेषत: हिंदी महासागरातून नौदल काढून घ्यायची व पूर्वेतून आपले हितसंबंध अधिकाधिक कमी करायची घोषणा ब्रिटन करीत असतानाच्या ह्या काळात, आमच्या ह्या शेजाऱ्यांशी आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक दृढबंध निर्माण होणे आवश्यक आहे !

ब्रिटनच्या श्री. स्टुअर्टनी आपल्या भारत–भेटीत, काश्मीर वा अन्य कुठल्याही भारत–पाक प्रश्नांत स्वत:हून मध्यस्थी करण्याचा, काही तडजोड सुचविण्याचा ब्रिटनला अधिकारच नाही व तसे करण्याची ब्रिटनची इच्छाही नाही, असे सांगून, इंग्लंडच्या मध्यपूर्वेपलीकडच्या राजकारणात, स्वत:ला गुंतवून न घ्यायच्या नवीन घोरणाचाच पुनरुच्चार केलेला आहे. ह्या बदलत्या राजकीय परिस्थितीत, ब्रिटिश सरकारी प्रतिनिधीची ही पहिलीच भारत–भेट ! शिवाय, ६३ वर्षांचे मितभाषी, लेबर–पार्टीचे पुढारी श्री. स्टुअर्ट हे ब्रिटिश आमदानीत कधीही भारतात न वावरलेले व त्यामुळे भारतविषयक काहीसे अलिप्त धोरण, मत असू शकणारे, म्हणूनही ह्या भेटीविषयी थोडेसे औत्सुक्य होतेच ! ह्या भेटीत, भारताला ब्रिटनतर्फे विकास योजना, औद्योगिक प्रकल्प, छोटया उद्योगपतींना मशिन्ससाठी मदत, वगैरेंसाठी कर्ज देण्याच्या करारावर, दिल्लीत सह्या झाल्या. हे कर्ज व्याजरहित असून, पंचवीस वर्षे मुदतीचे आहे. ह्याशिवाय अनेक प्रश्नांवर त्यांनी भारत–भेटीत चर्चा केली.

ब्रिटन आणि भारताचे संबंध कधीच फारसे चांगले नव्हते व आजही ते सुधारलेले नाहीत. परंतु ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या अंमलामुळे हे दोन्ही देश शत्रुत्वाच्या स्थितीत का होईना, वैचारिक, सांस्कृतिकदृष्टया बरेच जवळ आलेले आहेत. स्वातंत्र्यानंतर वीस वर्षांनीदेखील ब्रिटिश संस्कृतीचे बरेचसे ठसे भारतीय प्रकृतिवर आजही अस्तित्वात आहेत व पुढेही ते राहणार आहेतच. स्वातंत्र्यानंतर, वास्तविक भारत–ब्रिटन ह्यांच्यांत शत्रुत्व असे नाही, पण तेढ मात्र निश्चित आहे. ब्रिटिशांनी भारत सोडला खरा, पण उपखंडाची दोन शकलं करून व कश्मीरच्या स्वरूपात एक डोकेदुखी ठेवून ! त्यांनंतरही स्वातंत्र्यचळवळीत मुस्लीम लीगने ब्रिटिश सरकारला दिलेल्या पाठिंब्यामुळेच की काय न जाणे, पण ब्रिटिश मैत्रीचे झुकते माप पाकिस्तानच्या बाजूनेच सतत राहिले. कश्मीर प्रश्नही इंग्लंडच्या, उपखंडातल्या हितसंबंधांमुळे सारखा चिघळत ठेवला गेला. कश्मीरवर अमेरिकन मत आपल्या बाजूला खेचण्याची कारवाईही ब्रिटननेच केली. भारत–ब्रिटन तेढ वाढतच राहिली. १९६५ च्या सुएझ प्रश्नाच्या वेळी, भारताने उघड उघड ब्रिटन-विरोधी भूमिका घेतली. तर १९६५ मध्ये ब्रिटनने पक्षपाती भूमिका घेऊन, भारताला आक्रमक म्हटले ! परंतु हे सारे दिवस आता संपले आहेत ! अतिपूर्वेतून आपला गाशा गुंडाळायचा व युरोपीय राष्ट्रांशी अधिक घनिष्ठ संबंध प्रस्थापित करायचे आणि युरोपीय सामायिक बाजारपेठेत प्रवेश मिळवायचा हे नवीन धोरण आता ब्रिटनने स्वीकारलेले आहे. जवळ जवळ वर्षापूर्वी झालेले पौंडाचे अवमूल्यन, जागतिक राजकारणातले नवीन वारे ह्यांच्या पार्श्वभूमीवर आपले निश्चित स्थान काय हे इंग्लंडने बहुधा जाणले असावे व त्याला हे अधिक वास्तववादी धोरण उद्‌भवले असावे. श्री. स्टुअर्ट ह्यांच्या वक्तव्याचा अर्थ द्यायचा, तर अतिपूर्वेबाबत व उपखंडाबाबत, ब्रिटन आता तटस्थ धोरण स्वीकारील व सर्वांच्या मैत्रीसाठी प्रयत्न करील असाच घ्यावा लागेल !

## विज्ञान आणि अध्यात्म

दि. ८ डिसेंबरला ठाण्याला मराठी विज्ञान परिषदेचे तिसरे अधिवेशन पार पडले. केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण उद्‌घाटक होते, तर राहुरीच्या संकल्पित कृषिविद्यापीठाचे नियोजित कुलगुरू श्री. हरिश्चंद्र पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. यशवंतरावांनी विज्ञानाची महती गायिली व मराठी तरुणांनी धर्म वगैरेची नव्हे तर विज्ञानाची कास धरली पाहिजे असे आवाहन केले. श्री. हरिश्चंद्र पाटील ह्यांचे अध्यक्षीय भाषण अधिक चिंतनशील होते. अगदी साहजिकच त्यांनी शेतीविषयक दृष्टिकोणातून विज्ञानाची चिकित्सा केली. शेतीची

अधिकाधिक शास्त्रीय दृष्टिकोणातून चिकित्सा होऊन, अधिक उत्पादनासाठी वैचारिक चिंतनाबरोबरच, प्रात्यक्षिकेही घडवून आणली पाहिजेत हे त्यांनी अगदी योग्य असेच सांगितले. कृषिविषयक शिक्षणसंस्थांतून मिळणारे शिक्षण, होणारे विचारमंथन आणि लागणारे शोध ह्यांचा अत्यंत जलद गतीने प्रत्यक्ष शेतांवर उपयोग करण्यात आला तरच त्यांचा खरा फायदा. सध्या होणारे कृषि-पदवीधर, शेतांऐवजी बहुधा मोठमोठ्या शहरांतून सरकारी कचेऱ्यांत ज्या प्रमाणे बसलेले आढळतात, तसेच जर होणार असेल तर ह्या वैज्ञानिक प्रगतीचा काहीच फायदा होणार नाही. श्री. पाटील ह्यांनी नेमके हेच आपल्या भाषणातून सुचवले आहे; पण असे घडेल का, हा खरा प्रश्न आहे. सध्याच्या कृषिपदवीधरांकडून ह्याच अपेक्षा पूर्वी व्यक्तविण्यात आल्या होत्या. परंतु अशा पदवीधरांपैकी, प्रत्यक्ष शेतावर राबायला गेलेले पदवीधर, खरोखरच बोटांवर मोजण्याइतकेच असतील. बहुसंख्य शिरले ते शहरी वास्तव्यातील नोकरीच्या चक्रातच, आणि शेती होती तिथेच राहिली ! परिणामी, धान्योत्पादनात अपेक्षित वाढ झाली नाही व धान्य-आयात मात्र वाढली ! परंतु आस्ते आस्ते ही परिस्थिती बदलत आहे. शेतकरी नवनवीन सुधारणा, नवी खते, सरकारी सवलती वगैरेंबाबत अधिकाधिक जागृत होत आहे. त्यांचा लाभ उठवू पाहत आहे. भाव बांधून देण्याच्या नवीन उपक्रमांमुळे त्याला स्थैर्यही प्राप्त होऊ पाहत आहे. पण हा फायदाही एका विशिष्ट वर्गाकडूनच उचलला जात आहे, आणि त्यामुळे बागाइती स्वरूपाच्या शेतीलाच त्याचा लाभ मिळत आहे. महाराष्ट्रभर, किंबहुना देशभर, पसरलेला सर्वसामान्य शेतकरी अद्यापही अज्ञानातच खितपत पडलेला आहे. त्यांच्यापर्यंत कृषिक्रांतीचे लोण पोचवणे हे खरे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. त्या दृष्टीने, त्या समाजातल्या तरुण शेतकऱ्यांना पुढे आणून, त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोण देण्याची आवश्यकता आहे व त्यांच्याच शेतीव्यवसायाला संरक्षण दिले गेले पाहिजे. दुसरा भाग जरी शासनाधीन असला तरी, पहिल्या भागाबाबत बरेच कार्य विज्ञान परिषदेला करणे शक्य आहे. श्री. पाटील ह्यांनी, विज्ञान परिषदेने शेतकरीमंडळे प्रस्थापून, त्यांद्वारे विज्ञानाने कृषिक्रांती हा मार्ग चोखाळावा असे सांगितले. त्याचा म्हणूनच, परिषदेने गंभीर विचार करणे आवश्यक आहे. मात्र ही 'शेतकरी मंडळे' मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगलीच्या परिसरात स्थापन न होता महाराष्ट्राच्या असंख्य दुर्लक्षित खेड्यापाड्यांतून स्थापन व्हायला हवीत !

धार्मिक आचारविचारांना आता सुटी द्या आणि विज्ञानाची कास धरा, असे, विज्ञानपरिषदेच्या व्यासपीठावरून श्री. यशवंतराव सांगत असतानाच धार्मिक शिक्षण, 'सर्व धर्म समान' शिकवणुकीचा प्रसार व आध्यात्मिक शिक्षणाची गरज ह्यांविषयी भारतीय विद्याभवनाचे कुलपती श्री. कन्हैय्यालाल मुन्शी आपली मते,

[पृष्ठ ६० वर]



# ज्ञानबाचं गुऱ्हाळ

## सौंदर्यकराविषयी म्हाळसादेवी

सिलोनच्या गृहखात्याचे मंत्री श्री. विजयानंद दहनायके म्हणून कुणीसे आहेत. ते परवा एके ठिकाणी म्हणाले की, स्त्रियांच्या सौंदर्यावर कर बसवावा म्हणजे सरकारला चांगले उत्पन्न मिळेल. स्त्री ही जेवढी अधिक सुंदर असेल तेवढा कर अधिक असावा ही सौंदर्याची कसोटी किंवा मूल्यमापन दुसऱ्या कुणाकडे सुपूर्द करूच नये. ज्या त्या बाईने स्वतःच आपण किती सुंदर आहोत हे ठरवावे. म्हणजे सरकारला बराच कर मिळेल.

दहनायके यांची ही सूचना वाचून मी अक्षरशः तोंडात बोट घातले. आपले मोरारजीभाई हे कर बसवण्याच्या बाबतीत फार कल्पक आणि प्रतिभावंत गृहस्थ आहेत असे म्हणतात. आपल्याकडून कोणकोणत्या प्रकारांनी कर उकळता येईल याचा विचार ते एकसारखा करीत असतात. मागे त्यांनी बक्षिसाचे रोखे काय काढले, मग सुवर्णरोखे काय काढले, सोनारांचा धंदा कसा बसला ही सगळी हकीकत आपल्याला माहीतच आहे. त्यांनादेखील जी गोष्ट सुचली नाही ती या विजयानंद दहनायके यांनी सुचवली हे पाहून या दहनायके यांच्या बुद्धिमत्तेबद्दल मला फारच आदर वाटला. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात प्रजेकडून पैसा कसा काढावा याचे अनेक मार्ग दिलेले आहेत. पण त्यांतही 'स्त्री सौंदर्यावर कर' हा उपाय नाही. केवढी ही अचाट प्रतिभा!

ते असू द्या. विचार करता करता मला वाटले की आपल्या देशात या प्रकारचा कर बसवला तर काय होईल हे पाहिले पाहिजे. या बाबतीत माझ्यासारख्या पुरुषाने 'बायकांत पुरुष लांबोडा' करण्यापेक्षा सरळ एखाद्या हुशार बाईची मुलाखत घेतलेली बरी. म्हणून बाहेर पडलो आणि सुप्रसिद्ध समाजसेविका म्हाळसादेवी यांच्याकडे गेलो. मी त्यांच्या घरी पोचलो तेव्हा म्हाळसाजी पलंगावर झोपल्या होत्या. बाहेरच्या दिवाणखान्यात बसूनही त्यांच्या घोरण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. त्यांचे पतिराज मल्हारराव (आय्. सी. एस्.) हे आपल्या मोलकरणीशी फावल्या वेळच्या गप्पा छाटीत बसले होते. माझ्या आगमनाचा हेतू सांगताच त्यांनी मला दिवाणखान्यात बसवले आणि उभयता आत अदृश्य झाले. बराच वेळ घोरण्याचा आवाज आला. चांगल्या दीड एक तासाने म्हाळसादेवी जागृत झाल्या. घाईघाईने बाहेर आल्यावर त्या ज्या स्वरूपात मला दिसल्या त्यावरून त्यांच्याकडून फारसा कर मिळण्यासारखा नाही हे माझ्या ध्यानात आले. पण नंतर त्या सर्व काही आटो-

पून अवध्या तासात परत आल्या तेव्हा त्या बऱ्याच बऱ्या दिसत होत्या. कराच्या रकमेत आणखी काही रुपयांनी वाढ करावी इतक्या त्या बदलल्या होत्या.

चहा पितापिता माझ्या आगमनाचा हेतू त्यांना सांगितल्यावर त्या पहिल्यांदा खुलल्या. मग नाराज होऊन म्हणाल्या,

"या टॅक्सेसनी मरायची पाळी आलीय माणसाला ! बंगल्यावर टॅक्सेस, नळाचे टॅक्सेस, सुपरटॅक्स...आता त्यात हा ब्यूटीफुल टॅक्स—"

"ब्यूटीफुल नाही, ब्यूटी–टॅक्स–" मी चूक सुधारण्याचा प्रयत्न केला.

"तेच हो ! काही म्हटलं तरी टॅक्स चुकणार थोडाच ! त्यातून माझ्यासारखीला तर भलतीच अमाऊंट भरावी लागेल. तुम्हांला नाही असं वाटत ?"

मी त्यांच्याकडे पुन्हा एकदा नीट निरखून पाहिले. खरे म्हणजे त्यांची भीती व्यर्थ होती. त्यांना अगदीच नॉमिनल टॅक्स बसला असता. टॅक्स माफ करा म्हटले असते तरी सरकारने त्यांचे ऐकले असते...

त्यांची भीती दूर करण्यासाठी मी म्हटले,

"नाही. तसं तुम्ही भिण्याचं कारण नाही. तुम्हांला कर पडेलसं वाटतच नाही मला."

"छः छेः ! यू आर् रॉंग मिस्टर ग्यानबा–" म्हाळसादेवी उसळून म्हणाल्या. "कर बुडवण्याची सवय नाही आम्हांला. अन् वशिलेबाजी अन् लाच याचा तर मला तिटकारा आहे. सार्वजनिक कार्यकर्त्यांचं 'कान्ट्रॅक्टर' पहिल्यांदा स्वच्छ पाहिजे."

"म्हणजे करॅक्टर ?"

"येस्. कॅरॅक्टर, आमचा थोरला मुलगा कॉन्ट्रॅक्टर आहेना, त्यामुळे तो शब्द चुकून तोंडात आला." म्हाळसादेवींनी हसत हसत खुलासा केला.

"मग बरोबर आहे." मी मान हलवली, "बरं, पण ते जाऊ द्या. मुख्य मुद्दा विचारायचाय मला तो असा की, हा कर आपल्या देशात बसवावा की नाही ? बसवला तर आपल्या देशात कितपत रिस्पॉन्स मिळेल ?"

म्हाळसाजींनी यावर डोळे मिटून गंभीर विचार केला. दोन मिनिटांनी डोळे उघडून त्या बोलल्या,

"अवश्य बसवावा. कारण आपल्या देशात माझ्यासारख्या सुंदर स्त्रिया खूप आहेत. त्यांच्याकडून सरकारला बरंच उत्पन्न मिळेल. आता असं म्हणण्यात आमचा तोटा आहे. पण देशाचा फायदा होत असेल तर वाटेल तेवढा कर भरून ही योजना यशस्वी करण्यास आम्ही स्त्रिया साहाय्य करू."

"पण आपलं सौंदर्य किती आहे हे आपणच कसं ठरवायचं ? त्यापेक्षा पुरुषांनी परीक्षा केली तर ?"

"पुरुष मुळीच नकोत. इतक्या सिंपल् गोष्टीला मेले पुरुष कशाला हवेत हो ?

ते कुणाचं रूप चांगलं म्हणतील त्याचा नेम नाही. आता समजा की, एखाद्या गरीब बाईलाच त्यांनी खूप सुंदर ठरवलं तर सरकारला काही फायदा आहे का तुम्हीच सांगा. श्रीमंतांच्या बायकांना तर हे मेले कध्धी चांगलं म्हणत नाहीत ! मग पैसा कसा मिळेल ?"

"बरं, समजा इतर बायकांनी ठरवायचं म्हटलं तर ? तुमच्या भगिनी समाजा-कडंच, समजा, आपल्या गावातलं काम दिलं, कुणावर किती कर बसवावा ते ! तर कसं काय ?–"

"फार घोटाळे होतील. सगळ्या पदाधिकारी बायका तेवढ्या खूप कर भरतील अन् बाकीच्या बायकांना कर देऊच देणार नाहीत. भारी मत्सरी असतात हो या बायका. तुम्हांला कल्पना नाही. अन् शिवाय स्वतःच्या सौंदर्याबद्दल त्यांच्या उगी-चच मूर्खासारख्या कल्पना असतात. आता आमचं कसं, नॅचरल ब्यूटी–".

म्हाळसादेवींचे एकूण विवेचन मोठे उद्बोधक वाटले. पुरुषांनी बायकांचं सौंदर्य ठरवून त्यांचं वर्गीकरण करणं ही गोष्ट खरं म्हणजे सोयीची अन् शहाणपणाची ! पण बायकांना ती गोष्ट कधीही मान्य व्हायची नाही. पुरुषाची पुन्हा विचार कर-ण्याची पद्धतच वेगळी. कर सरकारात भरण्याच्याऐवजी तिथल्या तिथेच वसुली करायची त्याला घाई व्हायची ! त्यातून पुन्हा प्रत्येकाला आपल्या बायकोपेक्षा परस्त्री अधिक सुंदर दिसते ! हा एक आणखी घोटाळा. त्यापेक्षा बायकांनीच हा कार्यभाग उरकावा म्हटलं तरी अवघड. पुरुष बरे पण बायका नकोत असं म्हण-ण्याची पाळी यायची. एक दुसरीपेक्षा सुंदर ठरली तर एकमेकींच्या झिंज्या धरून भांडणाचा निकाल करायची तयारी, त्यापेक्षा जिचं तिला आपलं रूप ठरवू द्या. तेच उत्तम.

"काय, कसला विचार करता आहात ?" म्हाळसादेवींनी लडिवाळपणे प्रश्न केला.

"प्रश्न असा की, जिचं तिनं आपलं रूप चांगलं वाईट ठरवायचं कसं ? त्याला काही वस्तुनिष्ठ कसोट्या लावता येतील का नाही ? का मॅजिस्ट्रेटसमोर शपथ घेऊन नुसतं ॲफिडेव्हिट द्यायचं मी फार लावण्यवती आहे म्हणून ?–म्हणजे पुरे का ?" मी आणखी एक प्रश्न विचारला.

माझा हा मार्मिक प्रश्न ऐकल्यावर म्हाळसादेवींनी बराच वेळ व्याख्यान देऊन आपले यासंबंधीचे विचार मांडले. ते थोडक्यात मुद्देसूद सांगायचे म्हणजे असे :

१. प्रत्येक स्त्री ही निसर्गतःच थोडीशी सुंदर असते हे सरकारने गृहीत धरावे त्यामुळे तिने जन्मभर थोडासा तरी कर भरणे आवश्यक समजले जावे.

२. पावडर, पोमेड, नाना प्रकारची सुगंधी तेले, अत्तरे यांचा वापर करणाऱ्या स्त्रिया अर्थातच जास्त सुंदर असतात. त्यांना जास्त कर असावा.

३. सेल्सटॅक्सप्रमाणे कापडाच्या दुकानी साडी–टॅक्स असावा. ज्या स्त्रियांचे साडी

खरेदीचे प्रमाण जास्त असेल ती विशेष सुंदर समजून तिने मुकाट्याने भरपूर कर भरावा. हा कर साडीच्या किमतीत जमा केल्यास सोयीचे होईल.

४. मंत्री, मोठे सरकारी नोकर आणि बडे व्यापारी यांच्या मोटारीतून फिरणाऱ्या बायका 'सौदर्याच्या पुतळ्या' समजल्या जाव्यात त्यांनी वाहन–कराबरोबरच हाही कर भरावा.

५. सिनेमा–नटीने प्रत्येक पिक्चरच्या प्रत्येक तिकिटागणिक विशिष्ट रक्कम कर म्हणून भरावी. (उदाहरणार्थ 'संगम' चित्रपटाची एक कोटी तिकिटे आतापर्यंत फाडली गेली असतील तर वैजयंतिमालेने निदान एक कोटी पसे सौंदर्य कर द्यावा.)

६. स्त्रीचे वय निदान दहा वर्षेतरी कायम असते. म्हणून तिला कायम वयाचा दाखलाही कर भरून देण्यात यावा.

७. एखाद्या पुरुषाने एखाद्या बाईस सुंदर म्हटल्यास कराची काही रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात यावी. मात्र ही रक्कम थोडी असावी. नाही तर पुरुषवर्ग कोणाही बाईला सुंदर म्हणण्यास धजावणार नाही आणि स्त्रियांची फारच मोठी गैरसोय होईल. मात्र आपले प्रेमप्रकरण चालू असताना आपण हे म्हणालो होतो त्याचा वस्तुस्थितीशी काही संबंध नाही, असे पुरुषाने सिद्ध केल्यास त्याला याबद्दल चार्ज करू नये. तसेच बायकोला खूष करण्यासाठी काही इरसाल नवरे हा शब्दप्रयोग वारंवार वापरतात. त्यांनाही याचा दंड बसू नये.

८. 'आपण खरोखर सुंदर नाही' असे एखाद्या स्त्रीने जाहीर केल्यास तिची ताबडतोब वैद्यकीय तपासणी करण्यात यावी व आवश्यकता असल्यास तिला 'मानसिक रुग्ण' म्हणून इस्पितळात पाठवण्यात यावे.

९. सौंदर्य करापासून मिळणारे अब्जावधी रुपयांचे उत्पन्न सौदर्य–प्रसाधनांच्या वस्तू मोफत वा अल्प किंमतीत देण्याकडे खर्च व्हावे. आरशावरील कर ताबडतोब उठवण्यात यावा.

शेवटची सूचना सांगताना म्हाळसादेवी म्हणाल्या,

"आरशाबद्दल मी मुद्दाम सांगितलं. कर उठवला म्हणजे परदेशी सुंदर आरसे देशात येतील. सध्याचे काय आरसे एकेक! अहाहा!...काही चांगलं दिसत नाही त्यात. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी काय सुंदर आरसे मिळायचे एकेक! बघितलं की कसं बरं वाटायचं पाहा...!"

मुलाखतीचा शेवट भलताच मार्मिक होता. मुलाखत लांबलीही होती. म्हणून मी त्यांना नमस्कार करून उठलो आणि घाईघाईने दाराबाहेर पडलो. मोठा सुस्कारा सोडला. रस्त्याने जाणाऱ्या चार–दोन चांगल्या बायकांकडे डोळे भरून पाहिले तेव्हा कुठं इतका वेळ गुदमरलेल्या मनाला थोडे बरे वाटले! ○

—ग्यानबा

# इंजिनियरिंग क्षेत्रातील मंदी

इंजिनियरिंग धंद्यांत गेली तीन वर्षे मंदीचे वातावरण आहे. या मंदीचा मुकाबला कसा करावा याविषयी अनेक विचार प्रदर्शित होत आहेत. अनेक योजना आखल्या जात आहेत. 'इंजिनियरिंग असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या वतीने कलकत्ता येथे मागील महिन्यात एक परिषद घेण्यात आली होती. इंजिनियरिंग धंद्यास एकूण औद्योगिक उत्पादनात फार महत्त्वाचे स्थान आहे. अनेक उद्योगधंदे या धंद्यावर अवलंबून आहेत. या मंदीचे वैशिष्टय म्हणजे १९६६ सालापेक्षा १९६७ सालात तिची तीव्रता वाढली. १९६६ साली एकूण उत्पादनशक्तीच्या ९७ टक्के उत्पादन होते ते १९६७ साली ८७ टक्क्यांवर घसरले. सर्वसाधारण प्रमाण हे असले तरी काही क्षेत्रांत मंदीचे प्रमाण जास्त आहे.

मूलभूत उद्योगधंद्यांत जस्ताचे पत्रे व पट्टया या धंद्यात उत्पादनशक्तीच्या केवळ १८ टक्के उत्पादन होते. लोखंड व पोलादी ओतकामात केवळ ३९ टक्के होते. बेअर कॉपर कंडक्टर्स या धंद्यात तर उत्पादनशक्तीच्या केवळ ६ टक्के उत्पादन होते. रेल्वे वॅगन्स, अॅल्युमिनियम पत्रे वगैरे धंद्यांत निम्म्या उत्पादनशक्तीचा विनियोगच होत नाही अशी परिस्थिती आहे. इतर इंजिनियरिंग धंद्यांत सर्वसाधारणपणे २५ टक्के उत्पादनशक्तीचा विनियोग होत नाही असे दिसून येते.

उत्पादनशक्तीच्या विनियोगाच्या प्रमाणाप्रमाणेच शिल्लक मालाच्या साठ्याचे वार्षिक उत्पादनाशी प्रमाण हाही धंद्यातील मंदी जाणून घेण्याचा एक महत्त्वाचा निकष आहे. त्या दृष्टीने पाहता मूलभूत धातुकामाच्या धंद्यात वार्षिक उत्पादनाशी शिल्लक मालाचे प्रमाण १९६६ साली १२४ टक्के होते तर भांडवली मालाच्या धंद्यांत ते ११२ टक्के होते. उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या मालाच्या (इंटर-मिजिएट गुड्स) धंद्यांत हे प्रमाण ४२ टक्के होते तर उपभोग्य वस्तूंच्या धंद्यांत हे प्रमाण ६७ टक्के होते. १९६७ साली हे प्रमाण थोडे घटले असले तरी सर्वच इंजिनियरिंग क्षेत्रांत अद्यापही वार्षिक उत्पादनाच्या निम्मा ते पाऊण मालसाठा पडून आहे. याचा अर्थ असा की, या क्षेत्राच्या मालास मागणी नाही.

उत्पादनशक्तीतील वार्षिक वाढ किती झाली हे पाहता असे आढळून येते की, मूलभूत धातुकाम धंद्यातील उत्पादनशक्ती १९६६ साली २० टक्के वाढली, भांडवली मालाच्या धंद्यातील उत्पादनशक्ती ७ टक्के वाढली व उपभोग्य मालाच्या धंद्यातील उत्पादनशक्ती १६ टक्के वाढली. १९६७ साली वाढीचे हे प्रमाण अनुक्रमे ०.१ टक्का, २० टक्के व ५ टक्के असे भरते. मूलभूत धातुकाम धंद्यातील प्रत्यक्ष उत्पादन १९६७ साली मागील वर्षापेक्षा १३ टक्क्यांनी घटले तर भांडवली

उद्योगातील उत्पादन ६ टक्क्यांनी घटले. वाढती उत्पादनशक्ती व घटती मागणी या कात्रीत इंजिनियरिंग क्षेत्र सापडले आहे.

उत्पादनशक्तीचा पुरेपूर विनियोग न होण्याचा एक महत्त्वाचा परिणाम असा झाला की, या धंद्यामध्ये उपलब्ध उत्पादनशक्तीचा पुरेपूर विनियोग होईपर्यंत नवीन धंदे काढण्यास आर्थिक मदत करावयाची नाही, असा निर्णय रशियाने घेतला आहे.

या मंदीच्या कारणांबावत बरेच मतभेद आहेत. लागोपाठ दोन वर्षे आलेल्या दुष्काळाने औद्योगिक मंदी आली असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे अप्रतिहत भाववाढीने जनतेची क्रयशक्ती खच्ची झाली व मागणी घटली असे सांगितले जाते. सरकारचे नियोजन गेली तीन वर्षे स्थगित असल्याचा हा परिणाम आहे, असेही म्हटले जाते.

स्थूलमानाने ही सर्व कारणे बरोबर आहेत; पण इंजिनियरिंग मालाच्या धंद्यांत अतिरिक्त गुंतवणूक झाली व त्यामुळे मागणी व या धंद्याची उत्पादनशक्ती यांचा मेळ राहिला नाही. हेच कारण अधिक जवळचे व महत्त्वाचे आहे. अशी अतिरिक्त गुंतवणूक होण्यास सरकारचे धोरणच जबाबदार आहे. उत्पादनात साहाय्य करण्यासाठी सरकारने नवीन कारखानदारांना विविध सोयी-सवलती दिल्या, सढळ हाताने पैसा पुरवला, त्यांच्या मालासाठी सरकारी खरेदीत राखीव प्रमाण ठेवले व या सर्व गोष्टींचा लाभ उठवण्यासाठी या क्षेत्रात एकच गर्दी उडाली. पुरेशी तयारी न करता, पुरेसे तांत्रिक ज्ञान नसता केवळ सरकारी धोरणाचा लाभ घेण्यासाठी नवीन इंजिनियरिंग उद्योग निघाले हे उघड दिसते.

सरकारजवळील पैसा संपुष्टात आल्यावर सरकारने आपली खरेदी कमी केली व याचा साखळीस्वरूपाचा परिणाम होऊन सरकारवर अवलंबून असलेले अनेक इंजिनियरिंग उद्योग डबघाईला आले.

इंजिनियरिंग क्षेत्रांतील धुरीणांनी विचारविनिमय करून या परिस्थितीवर उपाययोजना सुचविली आहे. ती अशी– १ : चौथ्या योजनेतील औद्योगिक धोरण असे ठेवावे की, ज्या योगे इंजिनियरिंग क्षेत्रातील उपलब्ध उत्पादनशक्तीचा पुरेपूर विनियोग होईल. २ : या धंद्यास लागणारा कच्चा माल आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध करावा. ३ : विकासकार्यक्रमांची गती वाढवून देशात या मालाच्या मागणीस चालना द्यावी. ४ : निर्यातवाढीची सर्वंकष मोहिम हाती घ्यावी.

नियोजनास सर्वसाधारणपणे विरोध करणाऱ्या उद्योगपतींनादेखील, त्यांच्या आर्थिक हितासाठी का होईना मोठ्या प्रमाणावरील चौथ्या योजनेची मागणी करावी लागत आहे, ही गोष्ट नियोजनाच्या अपरिहार्यतेची द्योतक आहे.

**– चंद्रशेखर मराठे**

God is dead
–Nietzche
Nietzche is dead
–God


We don't want to take sides in this purely sematic contraversey between two eminent adversaries. But what about preventing the next communal riot ? And what about fundamental human values ?

*Join the Indian Secular Forum*

## एक रविवार असा गेला...

## इंडियन सेक्युलर फोरम

रविवार ता. २४ नोव्हेंबर १९६८. दादरच्या कीर्ती कॉलेजचे आवार. सकाळची ९–९।। ची वेळ. दारावर लावलेला हा इंग्रजी बोर्ड न्याहाळत मी थोडा वेळ उभा राहिलो. गेले एक वर्ष वेगवेगळ्या प्रकारची धमाल करणाऱ्या 'इंडियन सेक्युलर फोरम'चे आज औपचारीक उद्‌घाटन होते. गेल्या वर्षभरात या मंडळींनी तसे खूपच उपद्व्याप केलेत. श्रीशंकराचार्यांना गोहत्येच्या प्रश्नांवर धार्मिक चर्चा करण्याचे आव्हान दिले ते या फोरमनेच. हिंदू धर्मग्रंथ गोहत्येच्या विरुद्ध नाहीत हे आपण श्रीशंकराचार्यांना वादविवादाने पटवून देऊ असा या मंडळींना विश्वास आहे. हमीद



प्रा. रा. भि. जोशी, न्या. वि. म. तारकुंडे, प्रा. गोवर्धन पारिख व अच्युतराव पटवर्धन

दलवाईंना साऱ्या भारतवर्षाचा फेरफटका मारून जातीय प्रश्नांचा अभ्यास करावयास याच लोकांनी प्रवृत्त केले. हमीद दलवाईंच्या गाजलेल्या भाषणांना आणि पुस्तकांना व्यासपीठ मिळाले ते याच फोरमचे. मशिदीवरून सवाद्य मिरवणूक न्यावयाचा हिंदूंना अधिकार आहे म्हणून सोलापूरला गणपती उत्सवाच्या वेळी जाऊन ठणकावून सांगण्याचे धैर्य याच लोकांनी दाखवले. संततिनियमनाच्या प्रश्नावर बोलावयाचा पोपला काडीमात्र अधिकार नाही हे पण याच लोकांचे मत. हसनेन यांचे 'भारतीय मुस्लीम : आव्हान आणि आवाहन' हे विचित्र पुस्तक याच लोकांनी प्रसिद्ध केले आणि वीर सावरकरांचे वैज्ञानिक निबंध भाषांतरित करण्याचे काम याच फोरमने अंगावर घेतलेले आहे.

प्रि. ए. बी. शहांसारख्या कुशल संघटकाने बघता बघता ही संस्था उभी केली आहे. जनसंघाच्या प्रा. कानिटकरांपासून प्रि. रेगे, हमीद दलवाई, हसनेन अशी अनेक माणसे आज या फोरमच्या व्यासपीठावर उभी आहेत. या मंडळींची सारीच

---

दत्तप्रसाद दाभोळकर

---

मते आणि मते मांडण्याची पद्धत साऱ्यांनाच पटेल असे नव्हे. मलाही त्यांचे काही विचार आणि विचार मांडण्याच्या पद्धती पटलेल्या नाहीत. पण तरीही एक गोष्ट मात्र खरी. अन्नस्वतंत्रता, स्वावलंबन, स्वदेशी, चोख प्रामाणिक कारभार या गोष्टींप्रमाणेच धर्माधर्मातील सलोखा आणि मूलभूत मानवी हक्क या दोन गोष्टी या देशात रुजवल्या गेल्या पाहिजेत. हे दोन प्रश्न कायमचे सुटतील असा काही नवा मार्ग या मंडळींना शोधावयाचा आहे. आजपर्यंतची त्यांची वाटचाल तशी बरीचशी प्रामाणिक वाटते.

या संस्थेचा उद्घाटन समारंभ म्हणूनच नोंद करण्यासारखा आहे. ठरल्या-प्रमाणे ठीक दहा वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. उद्घाटनसमारंभाला तसे शे-दोनशे लोक जमले होते. कीर्ती कॉलेजचा तो प्रशस्त हॉल तसा अपुराच पडत होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अनंत काणेकर, जॉर्ज फर्नांडिस वगैरे वेग-वेगळ्या क्षेत्रांतील माणसे उपस्थित होती. पण अशा कार्यक्रमांना येण्यात आणखी एक मजा असते. आपल्या ओळखीचे बहुधा कोणी भेटत नाही. पेंडशांच्या 'लव्हाळी'मधील देसाई आणि जेरुषा या मंडळींची आठवण व्हावी अशी माणसे थव्याथव्याने भोवती बसलेली असतात. या अशा मंडळींना पाहून पुरुषोत्तम सटकर प्रमाणेच आपण पण थोडा वेळ हबकून जातो. फार बडया बडया मंडळींचे विस्तृत संदेश परिषदेला आले होते. राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री, सरन्यायाधीश, त्रिगुण सेन, जयप्रकाश नारायण, काश्मीरचे मुख्य मंत्री सादिक, विक्रम साराभाई, अलीगढ मुस्लीम विद्यापीठातील प्रोफेसर, अनेकांचे संदेश होते. संदेश विस्तृत होते. या प्रश्नाची या मंडळींना असलेली आस्था या संदेशातून दिसत होती. सेक्युलर फोरम या संस्थेबद्दल या लोकांच्या मनात निर्माण झालेल्या अपेक्षा पण या संदेशातून स्पष्ट होत होत्या. फोरमची पाळेमुळे किती खोलवर रुजलीत हे कळून येत होते.

उद्घाटनाचे भाषण जस्टिस तारकुंडेंनी केले. त्यांचे भाषण हा वक्तृत्वाचा एक चांगला नमुना होता. जस्टिसचा रुबाब त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होता. पण जुन्याच गोष्टी नव्या पद्धतीने मांडण्यापलीकडे त्यांच्या भाषणात आणखी काही नव्हते. त्यांचे भाषण सुरू असताना एक मात्र अद्भुत घडले. छापील कार्यक्रम-पत्रिकेत ज्यांचा उल्लेख नव्हता असे अच्युतराव पटवर्धन सभागृहात आले. नेहमी-प्रमाणेच आपल्या तंद्रीत कोठेतरी प्रेक्षकांत जाऊन बसले. अच्युतराव आले मात्र, —आणि चैतन्याची एक लाट साऱ्या सभेला स्पर्शून गेली. खरं पाहता चैतन्याचा स्पर्श, परिसाचा स्पर्श हे शब्द फिके पडावेत असे काही घडले. सभोवार बसलेली देसाई, जेरुषा वगैरे मंडळी नगण्य वाटू लागली. साऱ्या कार्यक्रमाला भारतीय टच यावा असे आणखी एक घडले. अच्युतराव आल्यावर प्रि. शहा आपल्या खुर्चीवरून उठले. अच्युतरावांचा संयमी विरोध आपल्या आग्रहाने मोडून काढन अच्युतरावांना

त्यांनी अक्षरशः बळेबळे आपल्या हातांनी धरून उठवले. आपल्या खुर्चीवर नेऊन बसवले. स्वतः बाजूला जाऊन बसले.

## अधार्मिक शंकराचार्य

--अच्युतराव बोलायला उठले. अच्युतराव नेहमीच उत्कृष्ट बोलतात. पण अच्युतरावांचे ते भाषण ज्यांनी ऐकले त्यांचा तो रविवारच काय, पण आयुष्यातला किमान एक महिना वसूल झाला. अच्युतराव मोजके पण नेमके बोलतात. पण त्यांच्या त्या मोजक्या भाषणातील एकही शब्द आधी ठरवलेला नसतो. हलाहल पचवलेल्या सांबाच्या जटेतून झुळझुळ वाहणारी गंगा बाहेर पडावी. माथ्यावरच्या चंद्राचे चांदणे भोवताली पसरावे असे काही वाटते. अच्युतराव स्वतःच एका वरच्या आणि वेगळया पातळीवर उभे असतात असे नव्हे. साऱ्या सभेला ते त्या पातळीवर नकळत सहजपणे घेऊन जातात. समोर 'ड्रेन पाइप पॅण्ट' घालून बसलेल्या तरुणाकडे पाहत ते हसत हसत म्हणाले, "तो तरुण पाहिलात ! आपली ही पॅण्ट जगावेगळी आहे. आपण काही नवे करतोय असे त्याला प्रामाणिकपणे वाटतेय. पण खरे सांगू, तो सभोवतालच्या प्रवाहाच्या धारेत सापडलाय. त्याच्या भोवताली जे नवं म्हणून चाललंय त्याचं तो अनुकरण करतोय. तीस वर्षांपूर्वी खुद्द माझ्याबाबतही असेच घडले. रसेल—लास्की वगैरे मंडळींनी मला तेव्हा भारावून टाकले होते. ते लोक आमच्या पिढीचे 'हिरो' होते. ब्रिटिशांना या देशातून घालवल्याशिवाय या देशाचे भले होणार नाही या शब्दाची मोहिनी आमच्यावर पडली होती. आज प्रामाणिकपणे वाटते ब्रिटिश तसे वाईट नव्हते. ब्रिटिशांना हाकलण्यापेक्षा अस्पृश्यता नष्ट करणे अधिक महत्त्वाचे होते. आंबेडकर जे काही सांगत होते ते बरोबर होते. माझे आयुष्य मला पुन्हा जगावयाचे असेल तर माझी चूक मी सुधारू शकेन." भाषणाच्या ओघात त्यांनी लोकशाहीची एक सहजसुंदर व्याख्या फेकली. ते म्हणाले, "लोकशाही म्हणजे काही फक्त बहुमताचे राज्य नव्हे तर लोकशाही म्हणजे अल्पमतवाल्यांना मानाने आणि अभिमानाने जगण्याचा हक्क!" नंतर ते धर्माकडे वळले. म्हणाले, "समाज सुव्यवस्थित चालावयाचा तर काही नियम आणि संकेत हवेत. त्या नियमांना काही अधिष्ठान हवे. धर्म म्हणूनच आवश्यक. पण धर्मग्रंथ बदलणार नाहीत; असे म्हणणे हा खुद्द परमेश्वराचा अपमान आहे. त्याने पहिल्यांदा ज्या उंचीची माणसे निर्माण केली, धर्मगुरू निर्माण केले त्या उंचीची माणसे तो पुन्हा निर्माण करू शकणार नाही हे म्हणणे म्हणजे, नवनिर्मितीची त्याची ताकद संपुष्टात येत आहे असे म्हणण्यासारखेच नाही का? देशात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या असंतोषाला आणि दंगलीला उद्देशून ते म्हणाले, "या साऱ्या घटनांतून एक उफाळलेली ताकद व्यक्त होऊ पाहत आहे. सेक्युलर फोरमने या ताकदीला योग्य वाट दिली पाहिजे." बोलता बोलता अच्युतराव मध्येच संतप्त झाले. बहुधा होत नाहीत असे संतप्त झाले, म्हणाले, "मी तसा धार्मिक माणूस आहे. पण हा...

हा तुमचा शंकराचार्य... हा सांगतो, भाकड गायींना पाळा आणि अस्पृश्यताही पाळा ! माझ्या धार्मिक भावना हा अधार्मिक माणूस दुखावतो आहे "-- का कोण जाणे, पण अच्युतरावांच्या या वाक्याला टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. एखाद्या पालापाचोळ्यासारखे, एखाद्या भोवऱ्यात सापडून आपण दूर दूर फेकले जात आहोत असे वाटले आणि त्यानंतर अच्युतरावांनी अशीच आणखी काही वाक्ये बोलून आपले भाषण संपवलेही.

या भाषणानंतर आणखी काही वेळ, इतर काही ऐकणे शक्यच नव्हते. आणि सभेच्या संचालकांना पण त्याची जाणीव असावी. त्यानंतर कीर्ती कॉलेजच्या हिरवळीवर चहापानाचा कार्यक्रम होता. हा चहा फुकट होता. समारंभाचे संयोजक बेटे हुशार. त्यांनी ते आधी जाहीर केले नव्हते. नाहीतर या कार्यक्रमाला सारे कीर्ती कॉलेज अपुरे पडले असते. चहापानाचा कार्यक्रमही रंगला. एका गटाने समारंभाला आलेली 'युक्रान्त'ची मुले खड्या आवाजात आपापसात चर्चा करीत होती. 'आपण या कार्यक्रमावर बहिष्कार टाकूया. कार्यक्रम हिंदीत किंवा मराठीत झाला पाहिजे. 'इंग्रजी हटाव' हे, बोलणाऱ्या त्या मुलांच्या अंगावर त्या उन्हात टेरिलीनचे सबंध सूट होते. गळ्यावर टाय होता. डोळ्यांवर इंपोर्टेड गॉगल आणि हातात इंपोर्टेड घड्याळे होती. प्रि. डॉ. गोपाळ राणे त्या मुलांची समजूत काढीत होते. 'अरे हिंदी जरूर हवी. त्यासाठी पण भांडू. पण वेड्या भावनेच्या आहारी जाऊन समोरच्या ज्ञानगंगेवर बहिष्कार घालू नका.' पण त्या मुलांच्याकडे लक्ष द्यावयाला वेळ नव्हता. पलीकडे काही अतिजहाल विद्यार्थ्यांनी अच्युतरावांना घेराव केला होता. तापलेल्या खड्या आवाजांत ते अच्युतरावांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत होते. अच्युतराव मात्र शांत होते. मिस्कीलपणे हसत होते. खोडकर नातवांच्याकडे आजोबांनी मायेने पाहावे अशा मायेने त्यांच्याकडे पाहत होते. त्यातल्या एका तरुणाने तर आपला आवाज भयंकर चढवला. तो म्हणाला, 'अच्युतराव, आमचे नंबुद्रिपाद खूप बरे, ते खरे सेक्युलर आहेत. पण तो तुमचा विनोबा आणि जयप्रकाश आज काय करतोय ?—त्यांना जरा काही सुनवा ना !' अच्युतरावांनी त्या तरुणाला खूप वेळ बोलू दिले. मग हळूच म्हणाले, 'तुम्ही खूपच चांगलं बोलता बुवा. पण मध्यंतरी तुमच्या पार्टीची आणि मुशावरतची केरळात शादी झाली. त्या शादीसंबंधांत आता एखादे भाषण द्या ना !' आणि हसत हसत त्या चक्रव्यूहातून बाहेर पडून अच्युतराव सभागृहात शिरलेसुद्धा.

अच्युतराव सभागृहात शिरले आणि लगेच परिषदेचे काम पुढे सुरू झाले. त्यानंतर प्रि. एम्. पी. रेगे आणि जी. डी. पारीख यांची भाषणे होती. सर्वधर्म परिषदेतल्या भाषणांप्रमाणे ती भाषणे तात्त्विक चर्चेने ठासून भरलेली होती. प्रि. रेगेंचे भाषण ऐकून तर, त्यांचा मौजच्या दिवाळी अंकातील लेखही खूप साधा, सोपा आणि समजण्यासारखा आहे असे वाटले. हमीद दलवाईंचे भाषण काही वेगळ्या कारणांनी

गाजले. दलवाई फक्त पाच मिनिटे बोलले. आपल्याला हिंदी आणि इंग्लिश येत नाही म्हणून मराठीत बोलले. नेहमीप्रमाणेच 'गोल'गोल' बोलले. 'नेणत्या कर्मनिष्ठांचा' बुद्धिभेद व्हावा असे काही बोलले. समेत खऱ्या अर्थाने भाषण गाजले ते प्रि. शहांचे. शहांनी काही नवे आणि वेगळे मुद्दे मांडले. फार चांगल्या प्रकारे. भारतीय घटनेतील विसंगती त्यांनी पटवून दिली. ते म्हणाले, 'घटनेच्या एका कलमात पशुधनाची वाढ शास्त्रीय पद्धतीने करावी म्हणून सांगितलंय. आणि त्याच कलमात पुढं म्हटलंय, भाकड गाईंच्या हत्येवर राज्य सरकारांनी बंदी घालावी. आता या दोन गोष्टी एकाच वेळी कशा शक्य आहेत ? दुसऱ्या एका कलमात, सरकारने फक्त एखाद्याच धर्माला आर्थिक मदत देऊ नये असे बंधन आहे. या कलमातून तर फार भयंकर अर्थ निघतो. याचा अर्थ असा आहे की, सरकारने जर साऱ्या धर्मांना एकाच वेळी मदत केली तर हरकत नाही. भारतीय राजकारण आज झपाट्यानं बदलतंय. उद्या केंद्रात सत्ता हातात घेण्यासाठी दोन धार्मिक पक्षांना आपापसांत तडजोड करावी लागेल. — कदाचित एखाद्या कर्मठ धार्मिक पक्षाला खूष करून उद्या राष्ट्रपती निवडला जाईल, अशा वेळी अधिकारावर आलेल्या या मंडळींना धर्मोपदेशकांना खूष ठेवावे लागेल. विकासकार्यात जो पैसा खर्च व्हावा तो मंदिरे, मशिदी आणि चर्चेस या साऱ्यांना देणग्या देण्यात खर्च होईल,...मी सांगतो घटनेत लवकर बदल केला नाहीत तर हा काळ दूर नाही.' — प्रि. शहांनी गेल्या काही वर्षांत केलेली राजकीय भाकिते आश्चर्यकारक रीतीने खरी ठरलीत. इंदुमती पंडितांनी हेवा करावा इतक्या अचूकपणे खरी ठरलीत. म्हणून असेल कदाचित्. शहांच्या भाषणात एक वेगळी ऐट होती. अफाट आत्मविश्वास होता. सेक्युलर फोरमचे कार्य सांगताना ते म्हणाले, 'आम्ही कोणत्याच धर्माच्या बाजूचे नाही. कोणत्याच धर्माच्या विरुद्ध नाही. प्रत्येक धर्मातील कर्मठ लोक विरुद्ध प्रत्येक धर्माची नवी वैज्ञानिक रचना करू पाहणारे लोक असा हा झगडा आहे." आपले कार्य केवढे अवघड आहे हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आगरकरांचा वारसा हाच सेक्युलर फोरमचा वारसा आहे याची जाणीव करून दिली; आणि आणखी काही दशकांनी आपण या दिवशी या कार्यासाठी येथे जमलो होतो, याची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल असा विश्वास व्यक्त केला.

दुपारच्या जेवणानंतर निरनिराळे ठराव पास झाले. गोहत्येपासून रेडिओवर सकाळी भजने लावू नयेत, असे अनेक विषयांवरचे अनेक ठराव यात होते. स्वतःची ठरीव आणि रेखीव मते ठराविक पद्धतीने मांडण्यापलीकडे यात आणखी काही नव्हते. अनेक भाषा सफाईने बोलणाऱ्या प्रि. राणे यांनी आपले ठराव हिंदीत मांडले एवढीच यात नोंद करण्यासारखी घटना.

## सापळा !

— हा सारा कार्यक्रम संपला तेव्हा तशी सायंकाळ झाली होती. का कोण जाणे

पण मनावर एक प्रकारचें मळभ आले होते. साऱ्या कार्यक्रमाची एखादी एकसंध प्रतिमा मनावर तयार करता येत नव्हती. ' सेक्युलर फोरम ' हा शेवटी एक सापळा आहे. भंपक समजुती, कालबाह्य रूढी आणि विज्ञानविरोधी धार्मिक भावना यांचा निकाल लावण्यासाठी उभारलेला. पण कोणी सांगावे हा सापळा काही राजकीय कारणांनी पण उभारलेला असेल. परिषदेतल्या अलग अलग वाक्यांतून एक वेगळीच प्रतिमा पण तयार होऊ पाहत होती. जस्टिस तारकुंडे म्हणाले होते, ' ज्या शक्तींना तुम्ही सध्या जातीय म्हणून शिव्या हासडता ते लोक खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी आहेत. पण तरीही ते लोक सेक्युलॅरिझमचे विरोधक आहेत हे ध्यानात ठेवा. ' त्यानंतर झाडून सर्व वक्त्यांनी हा फोरम तरुणांच्या भावनांना योग्य वळण देवो ही इच्छा व्यक्त केली. पण योग्य वळण म्हणज काय ? सध्या तरुण कोणाच्या नेतृत्वाखाली जमा होताहेत हे सांगावयाचे सफाईने टाळले होते. प्रि. शहांनी तर आपल्या भाषणात कमाल केली. ते म्हणाले...Before it is too late before the Guru Golvalkar becomes the spiritual dictator of India !

—सेक्युलर फोरम हा सापळा कोणासाठी कोणी उभारलाय हे काही काळाने उघड होईल. एक गोष्ट मात्र खरी. यातले कोणतेही कारण राष्ट्रवादी शक्तींच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणूनच या फोरमबद्दल उदासीनता ठेवण्यापेक्षा राष्ट्रवादी शक्तींनी या फोरमला ' जागरूक सहकार्य ' दिले पाहिजे. ठराविक बौद्धिके, पोलादी संघटना आणि कडवी शिस्त यांच्या जोरावर चालू काळातील सारी आव्हाने आपण सर्वकाळ स्वीकारू अशा संभ्रमात या मंडळींनी फार काळ न राहणे बरे ! या अशा विचारात रस्त्यावर आलो तेव्हा चांगला काळोख दाटून आला होता. रस्त्यावर आलो आणि अस्वस्थतेत भर पडावी अशी आणखी एक घटना घडली. योगायोगाने नेमकी त्याच दिवशी अखिल भारतीय बौद्ध परिषद होती. समोरून नवबौद्धांची एक प्रचंड मिरवणूक येत होती, हिंदुधर्माने या बांधवांच्यावर शतकानुशतके केलेला अन्याय आठवला. मन संतापाने आणि शरमेन भरून आले. धर्म बदलूनही त्यांची सामाजिक स्थिती बदलवू न शकणारी या देशातील एक विचित्र चौकट आठवली आणि मन अगतिक बनत असतानाच अचानक वीर सावरकर आठवले. हिंदुधर्मातील अस्पृश्यतेविरुद्ध आणि विज्ञानविरोधी भावनांविरुद्ध जिहाद पुकारणारे ! या लोकांनी धर्म बदलला तेव्हा ते भारतीयच आहेत म्हणून ठणकावून सांगणारे.

अच्युतरावांनी सांगितल्याप्रमाणे कालबाह्य वाटणारा एखादा माणूस द्रष्टा असतो. आपण सर्वांना वाट दाखवील असे काही तो सांगून गेलेला असतो. चालू मताची झापड डोळ्यांवर असलेल्या आपणांला तो समजत नाही. विरोधकांना आणि अनुयायांना पण न समजलेले वीर सावरकर असेच काही तत्त्वज्ञान आग्रहाने पुढे मांडत होते.—' हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व ' हे गर्जून सांगताना ' भारतीयत्व

[पृष्ठ ३५ वर]

व्यं. न. कुलकर्णी

# लालासाब पाटील व चंद्री नायकीण

गोष्ट आहे १९४७ पूर्वीची.

तेव्हा भारतात इंग्रजांचं राज्य होतं. ब्रिटिशांच्या साम्राज्यावर त्या वेळी सूर्य मावळत नव्हता.

पण सत्य-अहिंसेच्या गर्जनांचा भारतातून निघालेला आवाज मात्र साऱ्या पृथ्वीलाच नव्हे तर चंद्र-सूर्य लोकावरदेखील ऐकू जात असे.

त्या वेळची ही गोष्ट.

अर्थात् पाटलाच्या पोराची. ( आज-काल सिनेमाला बी लई ब्येस ! सर्व हक्क स्वाधीन ! )

लालासाब पाटील तमाशाचं लई नादी. बाई नि बाटली आलीच मागो-माग. माघारणीच्या डोळ्यांना चोवीस तास पदर. कुस्तीचं मैदान, बैलगाड्यांची शर्यत, रमीचा डाव, बाटल्यांची मैफल, रात्रीच्या वेळी अर्थातच तमाशाचा फड अन् मग नंतर–

रात्री धन्याचं घरला येणं नाही म्हणून पाटलाच्या वाड्यात पाटलिणीचे हुंदके !

पाटलाचा चाळीस एकरांचा मळा होता; मळ्यात सदैव तुडुंब भरलेली विहीर होती. जिराईत शेती होती आणखी पंचवीस एकर. नदीकाठी पंचवीस एकर मळीही होती.

गुऱ्हाळ लागलं म्हणजे गावातल्या प्रत्येक उंबऱ्याला रसाची घागर, गुळाच्या वड्या अन् उसाची मोळी जायची. मळीतली कणसं घरोघर भाजली जायची. येणाऱ्या-जाणाऱ्याला ताजा हुरडा मिळायचा !

इंग्रजांचं राज्य होतं. पण खायला प्यायला त्या गावात तरी असं शिगोशीग वाहून जात होतं. लालासाब पाटील तरणाबांड. पण मनाचा असा उदार. गावा-तला नडलाअडला माणूस पाटलांच्या वाड्यातनं गुमान चार पायली दाणं घेऊन जायचा.

पण लालासाबाला ही अवदसा काय म्हणून आठवावी ? त्याला व्यसनं लागली.

गाव बोलू लागलं, "हा कारभार त्या रतनशेटचा ! त्यानंच लालासावाला बाटली अन् बाईचा रस्ता दावला !"

एका तमाशाच्या फडाला लालासाबांनी पाच हजार रुपये दिले. खुद्द चंद्री नायकिणीची भीड पडली. फड मुंबईत गाजवायचा बेत ठरला. पाटील बी सांगाती गेले. पण मुंबईत पैका कमीच पडला. आणखीन् दहा–बारा प्रयोग झाले तर तोटा भरून वर फायदाही राहील असा हिशेब, चंद्रीनं डोळ्यांतले अश्रू लालासावाच्या गालावर ढाळून पटवून दिला.

लालसाब गावी आले. पण रोख पैसा घरी नव्हता. रतनशेट म्हणाले,

"अडचणीच्या वेळी मदत करायची नाही तर मी कसला तुमचा मित्र ? हे घ्या दहा हजार रुपये नि मुंबईला जाऊन काम फत्ते करून या ! "

"कागदबिगद ? " लालासाबांनी विचारलं.

"अरे जाऊ द्या यार ! कागद करू नंतर. तुम्ही कुठं पळून जाता की काय ? तुम्ही गावचं पाटील. आमच्यासारखे काय पिशवी नि लोटा घेऊन आला होता ? अन् हे बघा, मुंबईला सध्या रेसचे घोडे धावताहेत. तिकडेही जाऊन या ! लागला लग्गा तर लाखो रुपये घेऊन याल !"

रतनशेटच्या जिव्हाळ्यानं लालसाब गहिवरले. त्यांनी मुंबईत तमाशा केला, रेसही बघितली नि अक्षरशः जिवाची मुंबईही केली. परत यायला पैसे राहिले नाहीत म्हणून मग पाटलांनी गळ्यातला गोफ आणि हातातली अंगठी विकली !

सारे पैसे फुकट गेले.

रतनशेटला लालासाहेबांनी मळा लिहून दिला. मुद्दल नि व्याज फुगत-फुगत गलं...शेवटी मळा गेला, व्याजापायी जमीन गेली, उरल्यासुरल्या बाकीपायी मळीही गेली. चंद्री तर केव्हाच गेली होती. वाडा नि पाटलीण उरली. अधेमधेच झालेली चार पोरंही होती. दोन मुली, दोन मुलगे.

ज्या वाड्यात धान्य वाहून जात होतं तिथं दातावर मारायला दाणा उरला नाही.

पाटलानं वाड्यातले जाप्ते भाड्यानं द्यायला काढले...पाटलिणीनं विहिरीत जीव दिला. सारा गाव हळहळू लागला.

पुढची गोष्ट तुम्ही कल्पनेनंही जाणू शकाल म्हणून इथंच थांबतो.

× × ×

## योजनांची नशा

सत्य–अहिंसेच्या प्रभावानं असो की सुभाषचंद्र बोस यांनी खुद्द सैन्यात निर्माण केलेल्या भारतप्रेमाच्या धसक्यानं असो, इंग्रज सरकार भारत सोडून गेलं.

आम्ही स्वतंत्र झालो.

आम्हांला वेगवेगळ्या नशा चढू लागल्या.

दारूबंदीची नशा आमच्या सरकारला अनावर झाली. तिकडे गटारे गटारे भरून

दुसरीच काळी दारू वाहू लागली लोकांच्या घशात.

पंचवार्षिक योजनांच्या मैफली झडू लागल्या. अब्जावधी रुपये उडाले !

समाज–कल्याण योजनांच्या तमाशांचे फड उभे राहिले. कोटींचे फटाके झडले.

या साऱ्या गोष्टींना पैका पाहिजे.

अमेरिका म्हणाली, " आमचे डॉलर्स घ्याना ! "

इंग्रजांनीही पौंड पुढे केले.

नुकताच स्वतः राखेतून उठलेला जर्मनीही मदतीसाठी आला; अन् असेच कितीतरी देश आमच्या झोळीत दान टाकू लागले.

घरच्या शेतीकडे आमचं दुर्लक्ष झालं. स्वतःचा वाडा साफ ठेवण्यापेक्षा परदेशातल्या इमल्यांचं दर्शन घेण्याकरता आम्ही हवाई दौरे काढू लागलो. या साऱ्या चैनीकरता परदेशांतली सरकारं पैसे पुरवत होतीच.

परदेशांत आमच्या वकिलाती नाहीत का ? पण त्यांना कामच उरलं नाही. कारण कर्ज मागण्याकरता मंत्रीच परदेशी उडू लागले. कर्जफेडीची मुदत वाढवून घेण्याची अर्जी देण्याकरताही मंत्रीच हवाई दौरे करू लागले.

जुनं कर्ज फेडण्यासाठी, नव्या कर्जाची मागणी करण्याकरताही मंत्रीच परदेशांची वारी करू लागले.

जुनं कर्ज फेडायचं एक आधुनिक तंत्र भारतानं निर्माण केलं आहे.

समजा, १९६८ साली आपण ' क्ष ' देशाचा शंभर कोटींचा हप्ता द्यावयाचा आहे. तो हप्ता तर दिलाच पाहिजे. नाही तर " सत्यमेव जयते " खोटं ठरेल !

तेव्हा आपण दीडशे कोटींचं नवं कर्ज त्या देशाकडून घेतो. त्यातले शंभर कोटी परत करतो. पन्नास कोटी वरती उरलेच आपल्या हाती योजनांच्या चैनीवर उडवायला. एकंदर पुन्हा दीडशे कोटी देणं राहिलं. पुढच्या वर्षी अडीचशे कोटी त्याच देशाकडे मागू म्हणजे झालं. आहे काय त्यात ? व्याजही त्यातूनच भागवू.

## आठ हजार कोटींचं कर्ज !

आपलं नियोजन मंडळ (प्लॅनिंग कमिशन) आहे ना ? त्याच्यातर्फे " योजना " नावाचं एक इंग्रजी पाक्षिक निघतं. या पाक्षिकानं म्हटलं आहे की आतापर्यंत आठ हजार कोटींचं परदेशी कर्ज भारताच्या डोईवर जमलं आहे. **आ ठ ह जार को टी ?** जरा आकड्याचा विचार करा. एक लाख नव्हे, दहा लाख नव्हे, दहा कोटी नव्हे, शंभर कोटी नव्हे एकंदर आठ हजार कोटी.

भारताची सध्याची लोकसंख्या पन्नास कोटी आहे असं समजू. म्हणजे माणशी १६० रुपयांचं आपल्या डोकीवर परदेशांचं देणं आहे. तुमच्या कुटुंबात मीना, लैला, बेबी, विवेक, दीपक, तुम्ही दोघं नवरावायको अशी सातच माणसं आहात असं मानलं तरी तुमचं परकीय राष्ट्रांचं देणं ११२० रुपये ठरतं. तुम्ही स्वतः कुणा वाण्याचं किंवा बँकेचं जे काय वेगळं कर्ज काढलं असेलं ते तर आहेच तुमच्या नशिबी !

असा हा साधा हिशेब आहे. समजला ना ?

तुम्ही स्वत: कधी अंकल सॅमकडे किंवा बुलडॉगकडे कर्ज मागायला गेला नव्हता हे खरं. पण तुम्ही स्वत:च्या मतदानानं ज्याला सर्व अधिकार अर्पण केले त्या तुमच्या कुलमुखत्यार सरकारनं प्रताप करून ठेवला आहे ! तुमच्या कुलमुखत्याराच्या पापाला तुम्ही जबाबदार आहा. तुम्हीच नव्हे तर तुमच्या पोटी जन्माला येईल तो भावी 'त्रिकोण' देखील ! अन् त्या 'त्रिकोणा 'चे त्रिकोणदेखील ! ! !

परवा अर्थमंत्री राजश्री मोरारजी देसाई यांनी माहिती दिली की आपण परत दिलीच पाहिजे अशी रक्कम फक्त पाच हजार सातशे एकाहत्तर कोटी एवढीच आहे. नियोजन मंडळ म्हणते आठ हजार कोटी, मोरारजी म्हणतात, अंदाजे सहा हजार कोटी ! या हिशेबांच्या घोटाळ्यात बरेच श्लेष काढायचे असतात. जाऊ द्या. आपण नियोजन मंडळाचा बडा आकडाच ग्राह्य धरू, कारण या मंडळात आपले डॉ. धनंजयराव गाडगीळ आहेत. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्सच्या एकेकाळच्या संचालकाचा हिशेब–ठिशेब जरा अधिक पक्का मानायला हरकत नाही.

चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारताला दरसाल ३७५ कोटींची परकीय मदत (म्हणजे कर्जच) मिळणार आहे म्हणे. पण तेवढीच रक्कम दरसाल याच मुदतीत फेडलीही पाहिजे असं मोरारजी म्हणतात.

म्हणजे कसा काय सावळागोंधळ चालला आहे तो पाहा !

## सावकारच अडचणीत

पौंड डळमळत आहे, फ्रेंच फ्रँक घरंगळायच्या बेतात आहे, त्यामुळं डॉलरही पेचात अडकला आहे अशा बातम्या तुम्ही वृत्तपत्रांत वाचत असाल. तात्पर्य, ही बडी बडी सावकार मंडळी स्वत:चा संसार नीट लावण्याच्या कामात गुंतली आहेत. त्यामुळं भिकेसाठी सततच झोळी पुढं करणाऱ्या भारताला पूर्वीइतकी मधुकरी कदाचित् मिळणार नाही, अशी भीती अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्यक्त केलेली आहे.

त्यात आता अमेरिकेत नवे अध्यक्ष मि. रिचर्ड निक्सन अधिकारावर येणार आहेत. त्यांचा कौल भारताच्या बाजूनं पडला तर बरं ! नाही तर काय करायचं या विचारानं भारत सरकार त्रस्त झालं आहे. मोठ्या सावकारानं पाय मागं घेतला तर छोटे सावकारही तसंच करणार !

आता निक्सनसाहेबांना प्रसन्न करून घेतलं पाहिजे. त्यांची टाळी वाजविल्याशिवाय का आपणांला पोळी मिळणार ? लवकरच त्यांच्याकडे " भारताला एकदा याच गडे," अशा अर्थाचा नाजुक निरोप जाईल हे मी आताच सांगून ठेवतो. (भविष्यवाद्यांनो, या भविष्याचा कॉपीराईट माझा आहे हं ! )

कर्ज कसं काढावं, कुठं मिळवावं, त्याची परतफेड कशी करावी याचं भारत सरकारचं तंत्र आता हळूहळू तुमच्या लक्षात आलं असेलच. इतर गरजू राष्ट्रांनी या विषयाचा डिप्लोमा दिल्लीला येऊन मिळवावा.

स्वित्झर्लंड, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क हे देश म्हणजे भारतातल्या दोन–तीन जिल्ह्यांएवढे असतील नसतील. त्यांच्याकडूनदेखील आम्ही भीक घेतली. आहे बरं का !

तात्पर्य, आज जगात आम्ही सर्वांत मोठे ऋणको म्हणून गाजत आहो ! माणसानं कोणत्या तरी पहिल्या क्रमांकावर असावं. आमचा असा हा डावीकडून पहिला नंबर आहे. अमेरिका जगातलं सर्वांत संपन्न राष्ट्र म्हणून प्रसिद्ध आहे काय ? तर मग आम्ही सर्वांत मोठे भिकारी म्हणून नामवंत आहोत !

तुमचेच पैसे घेऊन तुमचंच कर्ज फेडायची गंमत, आजपर्यंत चुटक्यांच्या रूपानं, आपण एक विनोद म्हणून वाचत होतो. भारत सरकारनं हा विनोद कृतीत आणला आहे !

आपलं सरकार पुष्कळदा कर्जाची सूट मागतं नि अनेक कर्जं, परदेशी सरकारांनी, बुडीत म्हणून (Write off) माफ केली आहेत. या गोष्टीची दिल्लीत कोणालाही लाज वाटत नाही. उलट त्याच देशांचं लांगूलचालन आमचे मंत्री, नवीन कर्जाकरता करतच असतात. अन् नवीन कर्जाच्या करारावर सह्या ठोकण्याकरता परदेश प्रवासाच्या तयारीला लागतात.

कोणाताही अब्रूदार माणूस कर्जदार म्हणून सही करताना लज्जेचे अश्रू आणि असहाय्यतेचे आवंढे अडविण्याची खटपट करत असतो.

पण अशा प्रसंगी आमच्या मंत्र्यांच्या मुद्रेवर विजयाचं हास्य विलसत असतं ! सहीसमारंभाच्या वेळी काढलेल्या त्यांच्या छब्या तुम्हीही पाहिल्या असतीलच !

बेशरमपणा, नादानपणा, खरखरमुंडेपणा, लाचारी इत्यादी गुणांचं मिश्रण इतक्या कुशलतेनं बनविल्याबद्दल या दिल्लीकरांना द्यावयाला एखादं जागतिक पारितोषिक नाही का हो ? ○

---

## इंडियन सेक्युलर फोरम

पृष्ठ ३० वरून

---

म्हणजेच हिंदुत्व' हे सांगण्यास ते विसरले नव्हते. ज्यांची पितृभू आणि पुण्यभू इथे आहे त्या साऱ्यांना त्यांनी भारतीय मानले. मुसलमानांबद्दलही त्यांच्या मनात द्वेष नव्हता. 'याल तर सह, न याल तर शिवाय आणि विरोधाल तर विरोधून' या त्रिसूत्रीत 'याल तर सह' ही बंधुत्वाच्या भावनेतून मारलेली हाक प्रथम होती. हिंदू, मुसलमान आणि इतरही अन्य धर्मांतील वेडगळ समजुतीविरुद्ध पहिला आवाज त्यांनीच टाकला. वाटलं, ज्या क्षणी हे राष्ट्र, सावरकरांचे हे एकसंध तत्त्वज्ञान पचवील, त्या क्षणी एक समर्थ, संपन्न, एकसंध, सेक्युलर असा भारत उभा राहील. ○

# कुटुंबनियोजन कार्यातील अनुभव

'दो या तीन बच्चे, होते है घर में अच्छे' अशी घोषणा आजच्या भारतातील कुटुंबनियोजन कार्यक्रमाची आहे. छोटया-मोठया शहरांत, खेडया-पाडयांत, रस्त्यांवर, वस्त्यांवर, नदीनाल्यांवर, पहाड-पर्वतांवर कुटुंबनियोजनाचे वरील घोषणेचे फलक पाहावयास मिळतात. गेली एक-दोन वर्षे वृत्तपत्रांतून, रेडिओ-मधून, सभाव्याख्यानांतून 'कुटुंब लहान तर सुख महान' चा संदेश सर्वसामान्य माणसाला ऐकावयास मिळतो. गेल्या १७ वर्षांमधील कार्यक्रमांमुळे व गेल्या दोन-तीन वर्षांच्या जोरदार प्रचारामुळे कुटुंबनियोजन हा शब्द भारताच्या कोनाकोपऱ्यांत, घरीदारी पोचला आहे. 'लहान कुटुंबा'च्या मूल्याच्या सार्वजनिक स्वीकारासाठी काम करीत असताना आलेले अनुभव वेधक आणि उद्-बोधक आहेत. त्यांतील काही अनुभव व थोडी आकडेवारी येथे उद्धृत करीत आहे.

कुटुंबनियोजन कार्याचा प्रचार करताना लोकसंख्या-वाढ, अन्नधान्यतूट, कापड, घरे, शाळा यांची गरज ह्या गोष्टींसंबंधी अद्ययावत आकडेवारी देण्याची सवय अनेक वेळा ग्रामीण भागातील नेत्यांच्या भाषणात पाहावयास मिळते. खेडयांत ह्या कार्यक्रमाची माहिती व्हावी व तेथील लोकनेत्यांना ह्या प्रश्नाचे स्वरूप समजावून द्यावे व नंतर त्यांनी ते इतरांना सांगावे, साधनांची माहिती लोकांना द्यावी म्हणून कुटुंबनियोजन प्रशिक्षणशिबिरे योजिली जातात. या शिबिरांच्या उद्घाटन व

ज. शं. आपटे

समारोप समारंभास पाहुणे सामान्यतः जिल्हा परिषदेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, समितिअध्यक्ष यांना बोलाविले जाते. ही मंडळी बहुतेक सर्व वेळी ह्या प्रश्नासंबंधी बोलताना केवळ लोकसंख्यावाढ ह्या एकाच बाजूने बोलत असतात. देशाच्या शिरगणतीचे आकडे, दोन गणतींमधील झालेली वाढ, देशाचे जन्म व मृत्यूचे प्रमाण, धान्य-आयातीचे आकडे अशी ही सारी आकडेवारी देऊन कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाचे भेसूर, भीषण, भयानक चित्र शिबिरार्थींच्या मनःचक्षूंपुढे उभे केले जाते. ही सारी आकडेवारी त्यांच्या डोक्यावरून जाते. त्यामुळे ह्या प्रश्नासंबंधी ग्रामीण पुढाऱ्यांच्या मनात वेगळीच कल्पना निर्माण होते. कुटुंबनियोजनाचे महत्त्व व उद्दिष्ट स्पष्ट करून सांगताना कुटुंबनियोजन हे कुटुंबकल्याणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. उद्दिष्ट आहे कुटुंबकल्याण, कौटुंबिक सुख, कुटुंबाचे भले व्हावे हे. म्हणून खेड्यांत कुटुंबनियोजनाची माहिती व शिक्षण देत असताना खेडुतांच्या दैनंदिन, जिव्हाळ्याच्या जीवनातील उदाहरणे, त्या गावची, त्या तालुक्याची व त्या जिल्ह्याची आकडेवारी देऊन कुटुंबनियोजनाचे उद्दिष्ट समजावून सांगितले पाहिजे. पण असे क्वचितच होते.

कुटुंबनियोजन कार्यक्रमात ' साधनानां अनेकता ' हे सूत्र महत्त्वाचे आहे. कुटुंबनियोजन—अंतर व पाळणा थांबविणे—ह्यासाठी अनेक साधने आहेत. ब्रह्मचर्यापासून ते तोंडी घ्यावयाच्या गोळ्यांपर्यंत सर्व साधने—मार्ग आपापल्या परीने चांगले आहेत. पाळणा कायमचा थांबवावयाचा असेल तर केवळ शस्त्रक्रिया करायला हवी, असे नाही तर, एखाद्या दांपत्याची मानसिक तयारी असेल तर सतत अनेक वर्षे (मासिक पाळी बंद होईपर्यंत) त्यास साधने वापरता येतील. ज्यांना शस्त्रक्रिया करून घ्यायची नसेल त्यांना मात्र साधनांच्या नियमित, नीट वापरासंबंधी मानसिक तयारी केली पाहिजे. साधनांचा सातत्याने वापर हे एक व्रत छोट्याशा जागेत, अनेक माणसांच्या गर्दीत, वर्षानुवर्षे एखादे साधन सातत्याने, नियमाने, व्यवस्थितपणे वापरणे ही साधी गोष्ट नव्हे. निश्चय, निर्धार ह्याविना हे शक्य नाही. अशी साधने वापरणारे अनेक स्त्री-पुरुष मला पाहावयास मिळाले. त्यांत पोलीस कॉन्स्टेबलची बायको, गिरणीत काम करणारा मजूर, चाळीत राहणारी गृहिणी, झोपडपट्टीत राहणारी भाजीवाली, सहकारी सोसायटीच्या जागेत राहणारा सरकारी नोकर, जवळच्या केंद्रातून वा मोठ्या शहरातील केंद्रांतून साधने आणवून अनेक वर्षे वापरणारी ग्रामीण अशिक्षित महिला असे समाजातील विविध थरांतील, स्तरांतील स्त्री-पुरुष पाहिल्यानंतर कुटुंबनियोजनाची ज्वलंत जाणीव व साधनांविषयीची दृढ भावन कशी असते, ह्याची खात्री पटते. वर्षानुवर्षे एकच साधन वापरणाऱ्या स्त्री-पुरुषांची एकदम नवीन साधन दाखवून त्याबद्दल फार आग्रह (खात्री पटविण्याच्या बाबतीत) धरून त्यांचा बुद्धिभेद करायची जरुरी नाही. कारण अनेक वेळा त्यांची मने दोलायमान होतात. जुन्या साधनांविषयीची श्रद्धा डळमळू लागते. शस्त्रक्रियेसंबंधी पतिपत्नींची मानसिक तयारी झाल्याशिवाय शस्त्रक्रियेसंबंधी कटाक्षाने सांगावयाचे

टाळायला हवे. शस्त्रक्रियेसंबंधी माहिती निश्चितच द्यावी, पण त्याचा अविवेकी, अनाठायी, अनावश्यक प्रचार नको.

अनेक वेळा खेड्यांत वा शहरांत कुटुंबनियोजन कार्याविषयी माहिती सांगताना एखादा सहजच बोलून जातो, " असे तुम्ही इतके सारे आम्हांला ब्रह्मज्ञान सांगता आहात, पण आपल्या स्वतःच्या बाबतीत काय ? का, लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण. " म्हणजे कार्यकर्त्याने उदाहरण, आचार करावा व मगच लोकांना सांगावे.

## चारही मुली मुलांसारख्याच

चार–पाच वर्षांपूर्वीचा प्रसंग. एके दिवशी एक मध्यमवर्गीय दांपत्य केंद्रात माहिती घेण्यासाठी आले. प्राथमिक चौकशी झाल्यावर कार्यकर्त्यांकडून त्यांना पुरुषाच्या शस्त्रक्रियेसंबंधी माहिती व मार्गदर्शन हवे होते. तेव्हा आजच्याइतका शस्त्रक्रियेचा प्रभावी प्रचार होत नव्हता. तरी पण पुरुषाची शस्त्रक्रिया करून घ्यायचीच या निश्चयाने ते दांपत्य केंद्रात आले होते. कार्यकर्त्याने त्यांना अपत्यासंबंधी माहिती विचारली. " चार मुली, सगळ्यांत धाकटी चार वर्षांची. आता अजिबात मल नको, " बाई म्हणाल्या. ' आपल्याला मुलगा नाही. ' असे सांगताच बाई जोरदार आवाजात बोलत्या झाल्या, " चारही मुली आम्हांला मुलासारख्याच आहेत. कोणी मुलगा होण्याची गॅरंटी दिली तरी तो नको. म्हातारपणी आम्हांला ह्या मुली सांभाळतील. " नवऱ्याची शस्त्रक्रिया नंतर काही दिवसांनी केंद्रात झाली.

आपल्या देशाच्या कुटुंबपद्धतीत मुलाला विशेष महत्त्व आहे. वंशाचा दिवा, कुलदीपक, वंशविस्तारक म्हणून त्याची महती व महिमा मानला जातो. ह्यामुळे ' पुत्र व्हावा ' म्हणून एका पाठोपाठ सात मुली एका दांपत्याला झाल्या. पुरुष मग शस्त्रक्रियेसाठी आला. कार्यकर्त्याशी बोलताना तो म्हणाला, " अहो, माझ्यापेक्षा माझ्या बायकोला, मुलगा व्हावा असे फार वाटत होते. पण अशी अपेक्षा करता करता सात मुली झाल्या. आता मात्र एकही चान्स घ्यावयाचा नाही, असे ठरविले आहे. बायकोची पूर्ण संमती आहे माझ्या शस्त्रक्रियेला. " नवीन परिस्थितीच्या संदर्भात मुलांचे स्थान व कन्येचे महत्त्व बदलत आहे, असे काही वेळा वाटू लागते. कुटुंबनियोजनामुळे मूल्येही बदलत असावीत.

कुटुंबनियोजन कार्यक्रमात केवळ संख्येलाच महत्त्व आले आहे असे काही वेळा वाटते. दोन मुलांत २ ते २½ वर्षांचे अंतर असावे म्हणजे मातेला व नवजात बालकाला आरोग्यप्रद ठरते. पण काही वेळा लग्नानंतर लागोपाठ फारसे अंतर न ठेवता अनेक दांपत्यांना मुले होतात. तीन मुले चार, दोन, सहा महिन्यांची ह्या वयाची झाल्यानंतर पति-पत्नी केंद्रात शस्त्रक्रियेची माहिती घेण्यासाठी येतात. " आमचा तीनचा कोटा पुरा झाला आहे. आता आम्हांला जास्त मुले नकोत. म्हणून कायमचे बंद व्हावे म्हणन मला शस्त्रक्रिया करून घ्यावयाची आहे. म्हणजे

कायमची कटकट बंद होईल." असे पती म्हणतो. पत्नीही जोरदारपणे शस्त्रक्रियेचा आग्रह धरते. कार्यकर्ता त्यांना सांगतो, "तुमची तीनही मुले लहान आहेत, पहिली पाच वर्षे मुलांच्या प्रकृतीच्या, वाढीच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. केवळ तीन मुले ह्या संख्येलाच महत्त्व नाही. तीन मुलांची प्रकृती, त्यांचेमधील अंतर ह्या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. शस्त्रक्रियेनंतर दुर्दैवाने काही बरे-वाईट झाले तर तुम्हांला पश्चात्ताप वाटेल. म्हणून मुले थोडीशी मोठी होऊ द्यात आणि मगच तुम्ही शस्त्रक्रियेसंबंधी विचार करा. तोपर्यंत तुम्ही कोणतेही साधन वापरायला हवे. आयुष्यात हा महत्त्वाचा निर्णय आहे. त्यासंबंधी परिपूर्ण विचार करा. शेवटी जीवनातील समाधान, आनंद हा महत्त्वाचा आहे. तोच हरवून गेल्यानंतर जीवन शुष्क, नीरस होईल. प्रतिपादन, बालसंगोपन ह्या गोष्टी कटकटीच्या आहेत अशा दृष्टीने विचार करू नका. ती एक जबाबदारी आहे, ते एक कर्तव्य आहे. ती जबाबदारी समर्थपणे व ते कर्तव्य पार पाडण्यात खरा आनंद व समाधान आहे."

## गोळ्यांकडून लूपकडे

१९६५ च्या जुलैपासून आपल्या देशात लूपचा प्रसार सुरू झाला. फार मोठ्या प्रमाणावर त्याची माहिती, प्रचार केला गेला. गर्भाशय वलय (लूप) साधन बसविण्यासाठी शिबिरे आयोजित केली गेली. पहिले वर्ष दीडवर्षभर १९६५–६६ मध्ये लूपचा स्वीकार अनेक स्त्रियांनी केला. पण काही काळातून लूप गर्भाशयातून उतरले व अंती स्त्रीमानसातूनही उतरले. लोकप्रियतेस ओहोटी लागली. खरे पाहता ३०% – ३५% स्त्रिया ( ज्यांना लूपमुळे त्रास, अडचण होणार आहे, ज्यांना ते नको आहे.) वगळता बाकीच्या स्त्रियांनी लूप बसवून घेतले तर त्यासारखे प्रभावी, सोयीचे निरुपद्रवी साधन अन्य नाही. लूपच्या लोकप्रियतेस जशी भरती आली तशीच ओहोटीपण आली. लूपच्या ह्या पडत्या काळातही काही स्त्रिया लूप बसवून घेण्यासाठी केंद्रात येतात. एका शिक्षित बाईंनी तोंडी घ्यावयाच्या गोळ्या दोन वर्षे अगदी नियमाने घेतल्या, दोन वर्षांनंतर त्या बाईंना आपण स्थूल होत आहोत असे वाटू लागले, गोळ्या घ्यायचे बंद करून लूप बसवून घेण्याचा निर्णय घेतला. लूपसंबंधी चांगल्या गोष्टी–परिणामकारकता, सोय–ह्या बाईंनी ऐकल्या होत्या. लूपच्या बाबतीत ज्या स्त्रियांना त्रास झाला आहे, ते गैरसोयीचे, अडचणीचे वाटले अशांपकी अनेक स्त्रिया त्यासंबंधी तक्रारवजा माहिती आपल्या नातेवाईकांना, मैत्रिणींना, शेजारणींना सांगतात. त्यामुळे ज्या स्त्रिया लूप वापरासाठी उत्सुक असतात, तयार असतात त्याही अशा तक्रारी ऐकल्यानंतर आपला विचार बदलतात. वाईट गोष्टींची प्रसिद्धी लवकर होते पण चांगल्या परिणामांची वा फायद्याची माहिती अधिकाधिकांच्या कानांवर जात नाही हा सामान्य नियम लूपच्या प्रसारालाही लागू आहे.

## बोलकी आकडेवारी

### महाराष्ट्र राज्य

| धर्म | टक्केवारी लोकसंख्या | शस्त्रक्रियांत टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ८२·२४ | ९०·०६ |
| मुस्लीम | ७·५७ | ५·७२ |
| ख्रिश्चन | १·४१ | ०·६३ |
| इतर | ८·७८ | ३·५९ |
| | १०० | १०० |

१९६७–६८ साली ३,३२,३२९ स्त्री-पुरुषांच्या शस्त्रक्रिया झाल्या. त्यापैकी २,३६,३६८ शस्त्रक्रियांच्या टक्केवारीचे विश्लेषण वर दिले आहे.

### मुंबई महापालिका

| धर्म | टक्केवारी लोकसंख्या | शस्त्रक्रियांत टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ६९·१० | ८५·६५ |
| मुस्लीम | १२·९६ | ८·५ |
| ख्रिश्चन | ६·९३ | ३·१३ |
| इतर | ११·०१ | १·५५ |
| | १००·०० | ९८·८३ (९८·८३) |

### पुणे महापालिका

| धर्म | टक्केवारी लोकसंख्या | शस्त्रक्रियांत टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ८१·२४ | ७८·०४ |
| मुस्लीम | ८·५७ | ८·९८ |
| ख्रिश्चन | २·९४ | ४·४५ |
| इतर | ७·२५ | ८·५३ |
| | १००·०० | १००·०० |

### नागपूर महापालिका

| धर्म | टक्केवारी लोकसंख्या | शस्त्रक्रियांत टक्केवारी |
|---|---|---|
| हिंदू | ७२·२९ | ८५·१० |
| मुस्लीम | ९·१४ | ८·२० |
| ख्रिश्चन | १·८६ | १·७० |
| इतर | १६·७१ | ५·०० |
| | १००·०० | १००·०० |

आधार – 'Sukhi Sansar' 'सुखी संसार' महाराष्ट्र राज्य सरकारचे त्रैमासिक. ऑक्टोबर १९६८ पान ४८–४९

मुसलमान व ख्रिश्चन लोक कुटुंबनियोजनसाधने वापरीत नाहीत असा एक सर्वसाधारण समज आहे. मुस्लीमधर्मात चार बायकांना सांभाळण्याची तरतूद आहे. त्यामुळे त्यांची लोकसंख्या झपाट्याने वाढण्याची शक्यता बोलून दाखविली जाते. चार बायकांशी लग्न करण्याची तरतूद असली तरी अपवादात्मक परिस्थितीतच सामान्य मुस्लीम चार स्त्रियांशी लग्न करतो. कारण एकीचा सांभाळ करणेच जेथे कठीण झाले आहे तेथे आणखी तिघी कशासाठी घरात येतील ? आर्थिक परिस्थिती, महागाई, घरांची टंचाई यांचा जाच साऱ्यांनाच सहन करावा लागतो. ह्या परिस्थितीवर मात करण्यासाठी मुसलमानांना व ख्रिश्चन लोकांना त्यांच्या धर्मातून कोणतीच प्रेरणा मिळत नाही. सारी सोंगे करता येतात पण पैशाचे सोंग मात्र करता येत नाही. मुसलमान व ख्रिश्चन यांपकी काहींना छोटया, आटोपशीर कुटुंबाची तीव्र जाणीव होत आहे, ह्या दृष्टीने आचारही घडत आहेत. मुसलमान व ख्रिश्चन स्त्रिया लूप बसवून घेत आहेत, पुरुष साधने वापरत आहेत आणि आवश्यक तेवढी मुले झाल्यानंतर शस्त्रक्रियाही करून घेत आहेत. डोईजड कुटुंब ही त्यांना काही अभिमानाची बाब वाटत नाही. छोटे कुटुंब, आटोपशीर कुटुंब हे कुटुंब कल्याणाचे एक साधन आहे हे त्यांना केव्हाना केव्हा तरी पटेलच. प्रश्न आहे तो काळाचा.

नवविवाहित दांपत्ये जेव्हा केंद्रात सल्लामार्गदर्शनासाठी येतात तेव्हा त्यांना पहिली काही वर्षे साधारणत: ४-५ वर्षे मूल नको असते. एका दांपत्याला त्यासंबंधी विचारता पतिपत्नी म्हणाली, 'देशाचा Five year plan आहे तशीच आमचीही पंचवार्षिक योजना आहे. आम्हांला खूप हिंडायचे आहे. त्यांत मुलाची अडचण नको." कुटुंबनियोजन म्हणजे संततिद्वेष नव्हे, निव्वळ संततिप्रतिबंधन नव्हे. आर्थिक अडचण, पतीपत्नींचा विद्याभ्यास, अन्य जबाबदारी असल्यास पहिला पाळणा लांबणीवर टाकावयास हरकत नाही. पण इतर गोष्टी व्यवस्थित असताना पहिला पाळणा मुद्दाम लांबणीवर टाकणे इष्ट नव्हे. प्रथम मूल नको म्हणून पहिला पाळणा लांबणीवर टाकण्यासाठी एका दांपत्याने चार-पाच वर्षे साधने वापरली आणि तेच दांपत्य मूल हवेच म्हणून केंद्रात मार्गदर्शनासाठी आले होते. साधनांच्या वापराचा व वंध्यत्वाचा काही संबंध नाही असे असले तरीही पतीच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाची भावना होती तर पत्नीच्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली होती. म्हणून पहिले मूल लवकर होऊ द्यावे कारण मूल होऊ शकते की कसे ते झाल्याशिवाय कसे कळणार ? शेवटी ऐश्वर्य, कीर्ती, श्रीमंती, राहायला हवेशीर जागा ह्या सर्व लौकिक गोष्टी घरातील मुलाविना व्यर्थ आहेत.

आपल्या देशात कुटुंबनियोजन हा काही मुख्य, एकमेव विकासाचा कार्यक्रम नाही तर भारतीय समाजविकासाचा अविभाज्य भाग आहे. शेतीसुधारणा, उत्पादनवाढ, शिक्षणप्रसार, आरोग्यसुधारणा, रोजगारीत वाढ ह्याही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. कुटुंबनियोजनाची भूमिका कुटुंबकल्याणाची आहे. उद्दिष्ट आहे कुटुंबसौख्याचे, प्रेरणा आहे समाजमंगलाची. O



# रुडॉल्फ एबेल
## दोन चेहऱ्यांचा हेर...

**उत्तरार्ध**

**अनंत भावे**

अटलांटा येथे एबेल तुरुंगवास भोगत होता. ८००१६–ए क्रमांकाच्या या कैद्याला वेगळी वागणूक देण्यात आली नव्हती. त्याला जशा सर्वसामान्य कैद्यापेक्षा अधिक सवलती मिळत नव्हत्या तशीच सर्वसामान्य कैद्यापेक्षा अधिक बंधनेदेखील त्याच्या-वर लादण्यात आली नव्हती.

अल्पावधीतच एबेल तुरुंगात रुळून गेला. इतकेच नव्हे तर त्याने तुरुंगात सर्वांची मर्जी संपादन केली. कैद्यांच्या मेळाव्यात त्याला मोठ्या सन्मानाने वागवले जाई. सर्वाधिक बंदोबस्तात असलेल्या एका कोठडीत एबेलबरोबर आणखी तीन कैदी बंदिवान होते. त्या तिघांना एबेलने ' ब्रीज ' खेळायला शिकवले. तुरुंगाच्या कला-विभागात तर एबेलला फारच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. कैद्यांमध्ये बनावट नोटा बनविणाऱ्या, खोटे दस्तऐवज बनविणाऱ्या गुन्हेगारांची संख्या अधिक होती. कला त्यांच्या बोटांत होतीच. एबेलने त्यांच्या कलागुणांना उत्तेजन देऊन नव्या निर्मितिक्षेत्रांचा परिचय त्यांना करून दिला. तुरुंगाच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या ख्रिसमस भेटकार्डांच्या निर्मितीबाबत एबेलने काही प्रयोगदेखील केले. एकोणिसशे अठ्ठावन्न आणि एकोणसाठमध्ये भेटकार्डांसाठी त्याने दोन चित्रदेखील काढली.

या आदर्श कैद्याने ' दी न्यूयॉर्क टाईम्स ' आणि ' साइंटिफिक अमेरिकन ' या नियतकालिकांना वर्गणी पाठवून त्यांच्या योगे तुरुंगभिंतींच्या पलीकडच्या विश्वाशी संबंध राखला होता. अन्य नियतकालिकांतून त्याच्याबद्दल लिहिल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल त्याला कुतूहल होते. त्यांचाही तो पाठपुरावा करत असे. शिवाय

*एकवीस जून एकोणीसशे सत्तावनला न्यूयॉर्कला अमेरिकन गुप्त हेर खात्याच्या अधिकाऱ्यांनी मार्टिन कॉलिन्स नामक व्यक्तीला अमेरिकेत राहून रशियाशी हेरगिरी केल्याच्या आरोपावरुन अटक केली. निरनिराळ्या नावांनी वावरणाऱ्या या शांत गुणी व्यक्तीला अमेरिकेत एक चित्रकार म्हणून ओळखले जात होते.*

*असे एक दोन गुप्तहेर अमेरिकेला मॉस्कोत ठेवता आले तर काय बहार होईल या शब्दांत अमेरिकन गुप्त हेरखात्याने कर्नल एबेल याचा गौरव केला होता. तीस वर्षं रशियन हेरगिरीचे सूत्रचालन त्याने अमेरिकेत राहून केले. रायनो हेहानेन या त्याच्या हस्तकाच्या फितुरीमुळे एबेल पकडला गेला.*

*लोकापवादाला न जुमानता जेम्स डोनोवन या प्रसिद्ध अमेरिकन वकिलाने हिमतीने या रशियन हेराची केस झुंजवली. प्रखर देशभक्त, कुशल गुप्तहेर आणि वत्सल कुटुंब प्रमुख अशा भूमिकांत वावरणारा एबेल शेवटी एकमतानं दोषी ठरला.*

*साठ साल उजाडले. अमेरिकन गुप्तहेर फ्रॅन्सिस गॅरी पॉवर्स याच्या बदल्यात एबेलची सुटका झाली. डोनोवेनचे माकित खरे ठरले होते का?*

डोनोवनने वजन खर्च केल्यामुळे कलाविषयक आणि इतर पुस्तकेही त्याला सातत्याने मिळत गेली.

एकदा डोनोवनने अटलांटामध्ये शिक्षा भोगत असलेल्या या आपल्या अशिलाला भेट दिली. बोलता बोलता न्यूयॉर्कला जाताना वाटेत आपण वॉशिंग्टनला उतरणार असल्याचा उल्लेख डोनोवनने केला. एबेलचे डोळे कुतूहलाने चमकले. त्याने विचारले, " आपण अमेरिकन गुप्तहेरखात्याच्या वॉशिंग्टनमधल्या वस्तुसंग्रहालयामध्ये कधी गेला आहात काय ?" डोनोवनने नकारार्थी उत्तर दिले. एबेल पुढे म्हणाला, " माझ्या प्रकरणातल्यादेखील काही वस्तू ठेवल्या आहेत तिथं असं मला कळलं. आपण वस्तुसंग्रहालयात जाऊन त्या पाहाव्यात, अशी इच्छा आहे माझी. काही वस्तू कदाचित राहून गेल्या असतील किंवा इतरही काही चुका झाल्या असतील त्यांच्या हातून. "

कमाल सुरक्षित कोठडीमध्ये असलेल्या एबेलला अमेरिकन गुप्तहेरखात्याची इतकी अचूक माहिती असावी हे पाहून डोनोवन चकित झाला. तथापि वस्तुसंग्रहालय पाहण्याचे वचन त्याने एबेलला दिले. त्याप्रमाणे एका खात्याच्या माणसाला बरोबर घेऊन त्याने वस्तुसंग्रहालय आणि विशेषत: एबेलच्या प्रकरणासंबंधीच्या वस्तूंची खोली पाहिली. अमेरिकन गुप्तहेरखात्याने आपले काम चोख पार पाडले होते. एबेल–वस्तुसंग्रहालयात कसलीही उणीव नव्हती.

रुडॉल्फ आयव्हॅनोव्हिच एबेलचा जन्म दोन जुलै एकोणिसशे दोन रोजी मॉस्को

येथे झाला होता. त्याचे आईवडील सुस्थितीत होते. त्याच्या वडिलांनी भरपूर प्रवास केला होता. त्यांच्याबरोबर प्रवास करण्याची संधी मिळाल्यामुळे एकुलत्या एक एबेलला अगदी लहान वयातच देशाची चांगली माहिती झाली होती. प्रथमपासूनच तो हुशार आणि अभ्यासू होता. शिक्षक होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. भाषा विषयात त्याला विशेष गती होती आणि ऐन विशीत मॉस्कोतील एका माध्यमिक शाळेत तो इंग्रजी, जर्मन आणि पोलिश भाषा शिकवत होता. वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्याच्या आयुष्यात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक म्हणजे त्याचा विवाह झाला आणि दुसरे म्हणजे त्याची रशियन गुप्तहेरखात्यात निवड झाली. गुप्तहेर-खात्याच्या परराष्ट्रीय शाखेमध्ये त्याची नेमणूक करण्यात आली.

सुरुवातीला गुप्तहेरखात्यातील शिकाऊ हेरांना तो इंग्रजी भाषा शिकवत असे. परंतु एकोणिसशे तीसच्या सुमारास, जर्मन भाषेवरील त्याच्या प्रभुत्वामुळे प्रथमच त्याला परदेशी प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. दुसऱ्या महायुद्धात, जर्मन आघाडीवर, गुप्तहेरखात्याचा अधिकारी या नात्याने त्याने गौरवास्पद कामगिरी केली. युद्ध संपेपर्यंत त्याला मेजरचा हुद्दा लाभला होता.

युद्ध संपल्यानंतर पश्चिम गोलार्धामध्ये रशियाने आपले हेरगिरीचे प्रयत्न अधिक जारीने सुरू केले. जागतिक वर्चस्वासाठी रशियाला अमेरिकेशी टक्कर द्यावयाची होती. अमेरिकेत जाणारे हेर कॅनडामार्गे अमेरिकेस जात असत. कारण परकीय प्रवाश्यांवर कॅनडामध्ये जाचक निर्बंध नव्हते. एकोणिसशे सेहेचाळीसमध्ये एबेलला जर्मनीत निर्वासितांच्या एका तुकडीत अॅन्ड्रयू कायोटिस या नावाने घुसवण्यात आले होते.

निर्वासित म्हणूनच एकोणीसशे सत्तेचाळीसमध्ये एबेल कॅनडात गेला आणि पुढील वर्षी तेथून अमेरिकेत आला. न्यूयॉर्कला मुक्काम ठोकण्याआधी त्याने सर्व देशभर भ्रमण केले. कदाचित अमेरिकेत वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या रशियन हेरगिरीच्या केंद्रांची माहिती त्याला करून घ्यावयाची असावी. त्याचबरोबर त्याच्या अखत्यारीत नसणाऱ्या हस्तकांशी ओळख करून घ्यायची असावी.

## मित्रांची कसोशीने निवड

एबेल एकोणिसशे पन्नास सालच्या जूनमध्ये न्यूयॉर्कमध्ये आला असावा. तो हॉटेलात राही. मात्र आपले हॉटेल तो वारंवार बदली. या सुमारास दोघा–तिघांशी त्याची अत्यंत घनिष्ठ मैत्री झाली. वास्तविक पोलादासारख्या कणखर मनाच्या एबेलला एकाकी राहणे अशक्य नसावे. भयाची भावना त्याला कधीच शिवलेली नसावी. तुरुंगाच्या तपासणीमध्ये एबेलचा बुद्धिमत्ता–निर्देशांक अत्यंत वरचा असल्याचे आढळून आले होते. त्याचे आत्मसंयमनही कौतुकास्पद होते. मात्र त्याच्या कार्याला आवश्यक असलेली काटेकोर यांत्रिकता आणि भावनाशून्य निष्ठुरता त्याच्या रक्तातच नव्हती. हेरगिरी ही स्वरूपतः एकाकीपणे करावयाची गोष्ट

आहे. त्यात स्वसंरक्षणासाठी मैत्रीच्या मुखावर पाणी सोडावे लागते. एबेलला मात्र हा भयानक एकाकीपणा सहन होण्यासारखा नव्हता. त्याने पुष्कळांशी मैत्री संपादन केली होती. मात्र मित्र निवडताना त्याने आत्यंतिक काळजी घेतली होती. एबेलचे सारे मित्र त्याच्यापेक्षा पुष्कळच तरुण होते. त्याच्यासारखेच चित्रकलेत रमणारे होते. आणि सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांपैकी कोणालाही राजकारणाबद्दल थोडीदेखील आस्था नव्हती. वृत्तपत्रातील रंगतदार बातम्यांविषयी ते पूर्ण उदासीन होते.

ॲलन विन्स्टन एबेलच्या कसोटीला पूर्णपणे उतरला होता. तो कोलंबिया विद्यापीठाचा पदवीधर होता. धनवान आईवडिलांशी भांडून त्याने आपला वेगळा मार्ग शोधला होता. त्याला चित्रकार व्हायचे होते. एकोणिसशे चौपन्नपर्यंत एबेलचा तो सर्वांत जवळचा मित्र होता. त्यानंतर बर्ट सिल्व्हरमन या दुसऱ्या चित्रकाराशी एबेलची दोस्ती जमली. ब्रुकलिन बिल्डिंगमध्ये दोघांचेही स्टुडिओ होते.

नॅशनल सिटी बँकेच्या बँक-बुकातील माहितीपत्रकात 'आणीबाणीच्या वेळी कृपा करून पुढील व्यक्तीला माहिती कळवा' या सदराखाली एबेलने बर्ट सिल्व्हरमनचे नाव व पत्ता लिहिला होता. सिल्व्हरमन आणि विन्स्टनवर एबेलचा गाढ विश्वास होता. विन्स्टनच्या नावावर तर बँकेत सेल्फ डिपॉझिट बॉक्समध्ये त्याने पंधरा हजार डॉलर्स जमा करून ठेवले होते. छाया-चित्रकाराच्या व्यवसायात कमावलेली ती सारी जायदाद आहे, असे एबेलने सांगितले होते. विन्स्टनला एबेलइतकेच कला आणि संगीत यांचे वेड होते. ते दोघे मिळून वस्तुसंग्रहालये, संगीतमैफिली आणि चित्रपट-नाटके यांना भेटी देत असत. कित्येक वेळा ते बरोबरच जेवीत. अशा वेळी एबेल स्वतः पाकसिद्धी करी आणि खास मद्यांची निवड करी. साक्षेपी एबेल या दोन्ही गोष्टी विलक्षण कौशल्याने करीत असे, हे वेगळे सांगावयास नको.

## मदतनिसाचे आगमन

आपल्या या सांस्कृतिक जीवनाबरोबरच एबेलचे हेरगिरीचे अत्यंत गुप्त आणि जोखमीचे काम चिकाटीने चालले होते. परंतु एकोणीसशे बावन्नच्या सुमारास आपल्याला कोणी स्थायिक मदतनीस हवा असे त्याला तीव्रतेने वाटू लागले. मॉस्कोला पत्र पाठवून त्याने तशी विनंती केली. अशाच एखाद्या प्रसंगासाठी म्हणून रशियाने तटस्थ युरोपियन देशांत अनेक हेर पेरून ठेवले होते. एबेलचा मदतनीस म्हणून त्यांच्यातील बत्तीस वर्षांच्या, लेफ्टनंटच्या हुद्यावर असलेल्या रायनो हेहानेन याची निवड रशियन गुप्तहेरखात्याने केली.

हेहानेनचा जन्म शेतकरी आईवापांच्या पोटी लेनिनग्राड येथे झाला होता. त्याने पदवी परीक्षा सन्मानाने पार केली होती. त्या परीक्षेसाठी त्याने फिनिश भाषेचादेखील अभ्यास केला होता. एकोणिसशे एकूणचाळीस साळच्या नोव्हेंबरमध्ये त्याला

शिक्षकाचे प्रमाणपत्र मिळाले आणि लगेच फिनो-रशियन आघाडीवर दुभाषा म्हणून गुप्तहेरखात्यात हेहानेनची वर्णी लागली. त्यानंतरच्या आठ वर्षांत रशिया व फिनलंड येथील हेरगिरीच्या कामांत त्याने आपली योग्यता सिद्ध केली. एकोणिसशे अठ्ठेचाळीस साली त्याला खास हेरशाळेत पाठवण्यात आले होते. वर्षभराने नवीन नाव धारण करून तो फिनलंडमध्ये स्वतःच्या नवीन नावाभोवती नवे अनुरूप वातावरण आणि पूर्वेइतिहास निर्माण करावयाचा होता. त्यायोगे प्रसंग पडल्यास अमेरिकेत प्रवेश करणे त्याला सोयीचे जाणार होते. 'युजेनं निकोलो मार्की' या नव्या नावाने त्याचे कागदपत्र तयार झाले होते. त्यांत नमूद केल्याप्रमाण मार्का जन्माने अमेरिकन असून आयुष्याचा बहुतेक काळ त्याने फिनलंडमध्ये घालवला होता. एका लोहाराच्या दुकानात मदतनीस म्हणून आणि मोटरमेकॅनिक म्हणून काम करता करता हेहानेनने आपली नवी भूमिका लोकांवर ठसवली. मार्काच्या संदर्भात कल्पनेने निर्माण केलेली माहिती सहज पचून जाईल अशी मॉस्कोची यथाकाल खात्री पटली, तेव्हा हेलसिंकी येथे अमेरिकेत प्रवेश करण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज हेहानेनने केला. अपेक्षेप्रमाणे कोणालाही संशय आला नाही. थोड्याच दिवसांत त्याचे परवानापत्र तयार झाले. फक्त त्याला जन्मदाखला आणि फिनिश सैन्यात कधीही सामील न झाल्याचा व मतदान न केल्याचा पुरावा सादर करावा लागला. एकोणिसशे बावन्न सालच्या ऑगस्टमध्ये एबेलचा मदतनीस म्हणून नव्या कामगिरीवर अमेरिकेत पाठवण्यापूर्वी तीन आठवड्यांच्या प्रशिक्षणासाठी मॉस्कोने हेहानेनला बोलावून घेतले. एका मोटारीत दडून बसून त्याने सरहद्द ओलांडली. तीन आठवडे इंग्रजी भाषेला उजळा देण्यात, सांकेतिक संदेशांचे तंत्र शिकण्यात आणि छाया-चित्रणकलेची रासायनिक माहिती करून घेण्यात त्याने घालवले. 'व्हिक' हे त्याचे सांकेतिक नाव होते आणि न्यूयॉर्कमधील 'मार्क' नावाच्या त्याच्या वरिष्ठाला भेटून पुढील गोष्टी ठरविण्याचा आदेश त्याला मिळाला.

मार्कला भेटणे, हेरगिरीसाठी हस्तकांची भरती करणे आणि न्यूयॉर्कमधील रशियन अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे असे त्याच्या कामाचे स्वरूप राहणार होते. प्रथमतः त्याला पाच हजार डॉलर्सची रक्कम देण्यात आली होती. अमेरिकेत त्याला महिना पाचशे डॉलर्स पगार मिळणार होता. शिवाय रशियामध्ये वेगळा पगार सरळ त्याच्या पत्नीकडे पाठवला जाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

पुन्हा एकदा मोटारीत दडून हेहानेन फिनलंडला आला. त्याची पत्नी रशियातच होती. परंतु आपल्या नव्या भूमिकेला बळकटी यावी म्हणून हान्ना कुरिक्का नावाच्या एका फिनिश स्त्रीशी त्याने विवाह केला. श्रीयुत आणि श्रीमती मार्की ऑक्टोबर महिन्याच्या एकवीस तारखेस न्यूयॉर्कला येऊन पोहोचले. दुसऱ्या दिवशी हेहानेन सेंट्रल पार्कमध्ये फिरायला गेला. तेथे कुंपणाच्या एका खांबावर त्याने लाल रंगात

आपल्या अंगठ्याचा ठसा उमटवला. या जागेची कल्पना त्याला मॉस्कोमध्येच दिलेली होती. तो अंगठ्याचा ठसा म्हणजे एबेलचा मदतनीस येऊन पोहोचल्याची खूण होती.

## पराकाष्ठेची सावधगिरी

हेहानेनला काही विविष्ट परिसरांची संदेशांसाठी दररोज पाहणी करावी लागे. एखाद्या ठिकाणी निळ्या खडूने आडवी रेघ काढलेली दिसे. त्याचा अर्थ नियोजित ठिकाणी संदेश ठेवण्यात आला आहे असा असे. रेघ उभी असली म्हणजे संदेश मिळाला असल्याची वार्ता ती सांगे. आपल्या पाच वर्षांच्या वास्तव्यात गुप्त संदेश ठेवण्या-उचलण्यासाठी न्यूयॉर्क शहरात हेहानेनला सात-आठ जागा निश्चित कराव्या लागल्या होत्या. एक जागा शहरातील भरवस्तीत असलेल्या सिमेंटच्या एका भितीला पडलेल्या भगदाडात होती. एका पुलाखाली सैल झालेल्या विटेच्या मागे संदेश लपवण्याची दुसरी जागा होती. अशाच कोणाचे सहसा लक्ष जाणार नाही अशा आणखीदेखील जागा होत्या.

एका प्रसंगी प्रॉस्पेक्ट पार्क येथील जिन्यावर असलेल्या एका लहानशा भोकाचा उपयोग एबेल-हेहानेनने संदेशासाठी केला. एबेलने तेथे ठरल्याप्रमाणे संदेश ठेवला, परंतु हेहानेनने संदेश उचलण्यापूर्वीच पार्कची व्यवस्था पाहणाऱ्या माणसाच्या लक्षात ते भोक येऊन त्याने ते तत्परतेने बुजवूनही टाकले होते. हेहानेनला तो संदेश कधीच मिळाला नाही. नंतर हेहानेनच्या सांगण्यावरून अमेरिकन गुप्तहेर-खात्याने पुराव्यासाठी त्या भोकातील सिमेंट उकरून तो संदेश मिळवला. एका पोकळ लोखंडी नळीत मायक्रोफिल्मची बारीक सुरळी ठेवलेली होती. त्यात 'मागील दोन भेटी का चुकवल्यास ? ' असा जाब हेहानेनला विचारला होता.

ज्या प्रकारच्या संदेशांची ठेव-उचल चालत असे ते पाहिले म्हणजे इतक्या परा-काष्ठेच्या सावधगिरीची काय आवश्यकता होती हे सकृद्दर्शनी पटत नाही. न्यूयॉर्क-सारख्या प्रचंड शहरात रस्त्यावर तासचे तास कोणी बोलत राहिले तरी कोणाचे लक्ष वेधले जाण्याची भीती बाळगायला नको. त्यामुळे एबेल-हेहानेनना प्रत्यक्ष भेटून संदेशांची देवघेव करणे सहज शक्य होते. आपला पाठलाग तर होत नाही ना याची खात्री सुरुवातीला हेहानेनला पुन्हा पुन्हा करून घ्यावी लागली हे ठीकच होते. परंतु आपला कोणालाही संशय आलेला नाही असे अल्पावधीतच त्याच्या लक्षात आले होते. मग अत्यंत जुजबी माहिती देण्याघेण्यासाठी, घरून आलेली पत्रे सुपूर्द करण्यासाठी अशा बिकट जागा शोधण्याची आणि संदेश-विनिमयाची गुंता-गुंतीची योजना निर्माण करण्याची गरजच कोठे होती, असेच कोणालाही वाटेल.

परंतु वरील प्रश्नाचे उत्तर एबेलच्या शिस्तप्रियतेत सापडेल. हेरगिरी यशस्वी करायची तर काही चांगल्या सवयी आपल्या अंगी कठोरपणे बाळगणे अत्यावश्यक आहे, असे त्याचे मत होते. अगदी लहानसान गोष्टीतदेखील कमालीची सावधगिरी

बाळगणे इष्ट आहे, असे तो मानत असे. आपल्या योजनेचा तपशील तो बारकाईने आखत असे आणि तितक्याच काटेकोरपणे तो अंमलात आणत असे. त्याकरिता वेळ कितीही लागला आणि काही अगदी चमत्कारिक कार्यपद्धती योजाव्या लागल्या तरी त्याला चाले. आपली पहिली चूकच आत्मघाताला कारणीभूत होणार अशी त्याची भावना होती. एबेल आणि हेहानेन यांनी आपली आयुष्ये पोलिसी राज्यात काढली होती आणि त्यामुळे अमेरिकेतील रक्षक दलव्यवस्थेचे चित्र त्यांनी भडक रंगात रंगवलेले असावे.

## एका नाण्याची कथा

एबेलची आत्यंतिक सावधगिरी इतकी अवघड होती की शेवटी तीच त्याच्या नाशाला कारणीभूत झाली. पोकळ पेन्सिली, लोखंडी नळ्या, आणि फिर्यादीपक्षाने म्हटल्याप्रमाणे 'स्काऊटची मुले वापरतात त्यापेक्षा वेगळ्या' विजेऱ्याही एबेलच्या हेरगिरीच्या उपकरणांपैकी काही होत. त्यांचा उपयोग संदेशांकित मायक्रोफिल्म ठेवण्यासाठी एबेल करत असे. विवक्षित ठिकाणी हस्तकासाठी ठेवलेली यांपैकी एखादी वस्तू तिऱ्हाइताला प्रसंगवशात सापडली तरी त्याला फारसा संशय येण्याची शक्यता नव्हती. एबेलने खऱ्यासारखी दिसणारी काही बनावट नाणीदेखील तयार केली होती. त्या नाण्यांचे डबीसारखे दोन भाग होत असत. मधील पोकळीत संदेश लपलेला असे.

हेहानेन येऊन पोचल्याची वार्ता कळताच त्याला पाठवलेला संदेश एबेलने असाच एका नाण्यात बंद करून विवक्षित स्थळी ठेवला होता. परंतु हेहानेनच्या सांगण्याप्रमाणे तो त्याला कधी मिळालाच नाही. कदाचित् सैल झालेल्या विटेमागे ठेवलेल्या त्या नाण्याची चमक कोणा वाटसरूला जाणवून त्याने ते खिशात घातले असेल किंवा चुकून एबेलने संदेशवाही नाणे खर्च करून खरेच नाणे त्या जागी ठेवले असेल.

आणखी एका नाण्याची कथा सांगण्यासारखी आहे. एकोणिसशे त्रेपन्न सालच्या उन्हाळ्याच्या दिवसांतील एका सकाळी जेम्स बोधार्ट या चौदा वर्षांच्या वर्तमानपत्रे टाकणाऱ्या पोराला एका गिऱ्हाइकाकडून काही चिल्लर मिळाली. चिल्लर हातात पकडून तो जिना उतरत असता अचानक पाय अडखळून त्याचा तोल गेला आणि हातातून ती चिल्लर निसटली. नाणी जिन्याच्या पायऱ्यांवर विखुरली. ती उचलत असताना एक नाणे त्याच्या हातातच दुभंगले, त्याच्या एका भागात मायक्रोफिल्म दडवलेली होती. एकाखाली एक काही संख्या लिहिलेल्या कार्डाचे छायाचित्र त्या फिल्मवर टिपलेले होते.

जेम्सने ते नाणे सरळ पोलिसांना नेऊन दिले. त्याच्या कर्तव्यतत्परतेबद्दल पोलिसांनी त्याचे कौतुक केले. जेम्स त्या जिन्यावर अडखळला नसता तर अजूनही ते नाणे कदाचित् अमेरिकी चलनामध्ये राहिले असते. न्यूयॉर्क पोलिसांनी ते नाणे गुप्तहेरखात्याकडे सुपूर्द केले. गुप्तहेरखात्याला त्या फिल्मवरील संदेशाचा उलगडा



**संदेश ठेवत असताना**

झाला नाही. तब्बल चार वर्षांनंतर, एकोणिसशे सत्तावन्न साली हेहानेनने त्या संदेशाचे रहस्य स्पष्ट केले!

## ठिसूळ मदतनीस

हेहानेनच्या अमेरिकेतील पहिल्या दोन वर्षांच्या वास्तव्यात त्याची एबेलशी प्रत्यक्ष गाठच पडली नाही. सगळा कारभार मिखेल स्विरिन या त्याला आधी मॉस्कोमध्ये भेटलेल्या मध्यस्थाकरवी व्हायचा. मिखेल स्विरिनच्या हालचालींचा अमेरिकन सरकारला संशय येऊ लागला तेव्हा तो एकोणिसशे चौपन्न सालच्या एप्रिलमध्ये अकस्मात अमेरिका सोडून निघून गेला. मग एकोणीसशे चौपन्न सालच्या ऑगस्ट महिन्यातील एके दिवशी एबेलची व हेहानेनची प्रत्यक्ष भेट झाली. प्रथमदर्शनीच हेहानेनबद्दल एबेलचे मत काही अनुकूल झाले नाही. बुटका, स्थूल देहाचा, जाड ओठांचा हेहानेन आळशी आणि विलासी असावा, असे एबेलला वाटले. त्याला मदतनीस हवा होता तो कणखर आणि कावेबाज. हेहानेन त्या दृष्टीने भलताच ठिसूळ दिसत होता. एबेलला आपल्याबद्दल वाटणारी तुच्छता हेहानेनला सुरुवातीलाच जाणवली आणि यथाकाल तो एबेलचा तिरस्कार करू लागला. 'मला एखाद्या शोफरसारखा वागवायचा तो' असे हेहानेनने सांगितले.

या पहिल्या भेटीनंतर मोटारीतून जात असताना हेहानेनच्या नालायकपणाचा पहिला अनुभव एबेलला आला. रेडिओवरून मॉर्सकोडपद्धतीने देण्यात येणारी काही

माहिती टिपून घ्यायला हेहानेनला एबेलने फर्मावले. पण मॉर्सकोडची माहिती हेहानेनला होती कोठे ? त्यावर एबेल संतापून म्हणाला, " बेकायदा हेरगिरी करणाऱ्या प्रत्येकाला मॉर्सकोड ठाऊक असलंच पाहिजे. मॉस्कोमध्ये मग शिकलास काय तू ? "

एकोणिसशे चोपन्न सालच्या नोव्हेंबरमध्ये एबेलला ' क्विबेक संदेश ' मिळाला आणि हेहानेनला बरोबर घेऊन तो न्यू जर्सीमध्ये सार्जंट ऱ्होड्सचा शोध घेण्यासाठी गेला. एबेलच्या दृष्टीने ऱ्होड्स उपयुक्त हस्तक होऊ शकला असता. कारण त्याचे नातेवाईक सैनिकी खात्यात काम करत होते. हे दोघे न्यू जर्सीला ऱ्होड्सचा शोध घ्यायला गेले खरे; परंतु ऱ्होड्स तेथे नव्हताच. तो ॲरिझोना संस्थानात निघून गेला होता. उघडच आपल्या ठावठिकाणाबाबत त्याने रशियन हेरांना चकवले होते. कोलोरॅडो संस्थानात ऱ्होड्सचे कोणी नातेवाईक राहतात, याची माहिती एबेलला होती. म्हणून हेहानेनला त्याने त्यांचा शोध घेण्याच्या कामगिरीवर पाठवले. हेहानेनला एबेलप्रमाणे इंग्रजी भाषा सफाईने बोलता येत नव्हती. (खटल्यामध्ये वारंवार, वकील फार वेगाने बोलत आहेत, अशी तक्रार तो करायचा.) कोलोरॅडो संस्थानात, सालिदा येथे हेहानेन ऱ्होड्सच्या विवाहित बहिणीला भेटला. आपल्या चमत्कारिक उच्चारांनी आणि खडबडीत भाषेने त्याने तिला अगदी घाबरवून सोडले. परंतु तिने भावाचा पत्ता मात्र दिला. मात्र त्यानंतर ऱ्होड्सला भेटण्याचे प्रयत्नच कधी झाले नाहीत.

त्यानंतर हेहानेनवर आणखी दोन व्यक्तींना भेटण्याची कामगिरी एबेलने सोपवली. परंतु हेहानेनला त्यांचा शोध करता आला नाही. शोधकाम करण्याची हेहानेनची खरोखरच कुवत तरी आहे काय, हे अजमावून पाहण्यासाठी एबेलने त्याला बेअर पर्वतावर पाठवले. तेथे एबेलने पैसे पुरून ठेवले होते. ते पैसे मिळवून हेहानेनने हेरगिरीच्या आरोपावरून आधीच तुरुंगात पडलेल्या मॉर्टन सॉबेल या रशियन हेराच्या पत्नीला—श्रीमती हेलेन सॉबेल यांना—ते द्यावेत, असे सांगितले.

त्या परिसराचा नकाशा घेऊन हेहानेन बेअर पर्वतावर गेला. दिलेल्या सूचनांच्या साहाय्याने पुरलेले पैसे शोधून काढण्यात त्याला यश मिळाले. परंतु हेहानेनला त्या पैशांचा लोभ सुटला आणि पैसे श्रीमती सॉबेलना न देता त्याने ते स्वतःच्याच खिशात घातले. मात्र यथा आज्ञा आपण पैसे श्रीमती सॉबेलना पोहोचवले आहेत, असे त्याने एबेलला सांगितले. आता, त्यांचा संबंध आल्यानंतर प्रथमच एबेल आपल्या मदतनिसाच्या कामगिरीवर खुश झाला.

एकोणिसशे पंचावन्न सालच्या मे महिन्यात हेहानेनने व्यवसायाचा देखावा करण्यासाठी न्यू जर्सी संस्थानातील न्यूयॉर्क येथे छायाचित्रकारीचा स्टुडिओ उभारावा असे ठरवले. परंतु हेहानेनला छायाचित्रणाची फारशी माहिती नव्हती. तेव्हा एबेलने त्याला त्या कलेचे कसून शिक्षण दिले आणि हेहानेनचा स्टुडिओ थाटला गेला.

या सुमारास एबेलला आपल्या सहकाऱ्याबद्दल आत्मीयता वाटू लागली. त्याच्यावर विश्वास जडल्यामुळे एबेलच्या हातून अशी एक चूक घडली की, त्यामुळे भविष्यात त्याला आपल्या स्वातंत्र्याला मुकावे लागले. हेरगिरीच्या खेळातील अगदी प्राथमिक नियम एबेलने मोडला. वास्तविक पाहता हस्तकांना आपल्या वरिष्ठाचे नाव आणि पत्ता कधीही समजू न देणे इष्ट असते. एबेलने मात्र छायाचित्रकारीचे काही साहित्य देण्यासाठी हेहानेनला सरळ आपल्या स्टुडिओमध्ये नेले. निष्काळजीपणाच्या या कृतीमुळे हेहानेन फितुर झाल्यावर अमेरिकन गुप्त पोलिसांना घेऊन सरळ एबेलच्या स्टुडिओत जाऊ शकला.

## हेहानेनची बेताल वर्तणूक

हेहानेनने न्यूयॉर्क येथे स्टुडिओ थाटून महिनाभर झाला नसेल तोच एबेलला बढती मिळाली. त्याच्या कामगिरीवर संतुष्ट होऊन वरिष्ठांनी त्याला कर्नलचा हुद्दा दिला आणि सहा महिन्यांची रजादेखील दिली. दहा जून रोजी पॅरिस आणि व्हिएन्नामार्गे रशियाला जाण्यासाठी एबेलने अमेरिका सोडली. एबेल गेल्यानंतर हेहानेनला एकदम मोकळे वाटू लागले. आता सांकेतिक खुणांचा शोध घेत दररोज विशिष्ट परिसरात फेऱ्या मारायला नको होत्या. रेडिओ स्टेशन उभारण्यासाठी सोयीची जागा शोधत उपनगरात लांबवर जायला नको होते. आणि मुख्य म्हणजे एबेलसारख्या शिस्तबाज वरिष्ठाकडून हेरगिरीचे धडे घेण्याचा त्रास चुकला होता. हेहानेनने शांतपणे स्टुडिओ बंद केला. आणि हेराला सर्वस्वी विशोभित आणि अपायकारक असे बेत्रंद जीवन तो जगू लागला.

नंतर खटल्यामध्ये डोनोवनने वर्णन केल्याप्रमाणे, " हेहानेनने सारी गुप्तता जणू वाऱ्यावर सोडून दिली होती. वास्तविक हेरानं गर्दीत जणू काही चेहरा पुसूनच वावरलं पाहिजे. गर्दीतलंच एक होऊन गेलं पाहिजे. उलट हेहानेनने तर लक्ष वेधून घेण्याचाच प्रयत्न चालवला होता. शेजारीपाजारी, घरमालक आणि अखेर पोलीस यांच्यादेखील लक्षात येईल इतकी हेहानेनची वर्तणूक बेताल होती. हेहानेनने न्यूयॉर्क येथे घातलेल्या धुमाकुळाची थोडी जरी कल्पना एबेलला रशियामध्ये आली असती तरी सहा वर्षांनी लाभलेल्या त्याच्या सुटीच्या आनंदावर विरजण पडलं असतं."

हेहानेनला व्होडका अत्यंत प्रिय होती आणि आयुष्यात प्रथमच हवी तितकी व्होडका पिण्याचे आर्थिक सामर्थ्य त्याला प्राप्त झाले होते. तो अखंड मद्यपान करी आणि रिकाम्या बाटल्या घरामागील अंगणात फेकून देई. त्या बाटल्यांची संख्या एवढी मोठी होती की, शेजाऱ्यापाजाऱ्यांचे लक्ष हेहानेनकडे सहजच गेले. हे सगळे कमी होते म्हणून की काय, हेहानेन आपल्या सोबतीच्या स्त्रीचा सार्वजनिक ठिकाणी जाहीर अपमान करू लागला. एका बेकरीच्या मालकाने पुढील आठवण सांगितली.

एके दिवशी अतिरिक्त मद्यपान करून हेहानेन आपल्या बायकोबरोबर बेकरीत आला. त्याने एक पाव विकत घेतला. नंतर पाव जमिनीवर फेकून तो उचलून

देण्याची आज्ञा त्याने बायकोला केली. सपशेल गुडघ्यावर बसून बायको पाव उचल लागली त्या वेळी हेहानेन निर्लज्जपणे खदखदा हसत राहिला.

एके दिवशी हेहानेनच्या घरामधून रडण्या-मारण्याचे चित्रविचित्र आवाज आले म्हणून घरमालक त्याच्याकडे आला. त्या वेळी हेहानेनच्या डाव्या पायाला सुरीने मोठी जखम झाली होती आणि त्याची बायको कोपऱ्यात रडत होती. घरमालकाने पोलीस ॲम्ब्युलन्स बोलावली. काही बांधाबांध करताना आपल्याला जखम झाली असे हेहानेनने पोलिसांना सांगितले.

हेहानेनला एबेलची मदतनिशी सांभाळणे जड जाऊ लागले असावे. त्याने बहुधा तो एवढा अस्वस्थ आणि दुःखी झाला होता. त्याच्या वरिष्ठांनी त्याला याहून कितीतरी सोप्या कामगिरीवर पाठवण्याचे आश्वासन दिले होते. त्याऐवजी पावलो-पावली धोका असलेल्या या बिकट हेरगिरीचे काम त्याला करावे लागत होते. आणि तेदेखील एबेलसारख्या शिस्तबाज, कर्मठ माणसाच्या हाताखाली. ते दुःख विसरण्यासाठी बहुधा मद्यपानाच्या व्यसनात तो अधिकाधिक बुडत गेला असावा.

## मदतनीस फितुर झाला

एकोणिसशे छप्पन्न सालच्या सुरुवातीला एबेल सुटी उपभोगून परत आला आल्यावर त्याने हेहानेनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु हेहानेन मुळी सांकेतिक सूचनांची आणि संदेशाची दखलच घेत नव्हता, अखेर बऱ्याच प्रयत्नां-नंतर त्याला गाठण्यात एबेलला यश मिळाले. छायाचित्रणाचा व्यवसाय कसा चालला आहे, या एबेलने विचारलेल्या प्रश्नाला तो 'बंद झाला' एवढेच उत्तर हेहानेनने दिले. स्टुडिओ बंद करण्याची समाधानकारक कारणे हेहानेनला देता आली नाहीत. कामात कुचराई केल्याबद्दल एबेलने त्याची चांगलीच कानउघाडणी केली. मग एकदम त्याने पवित्रा बदलला. हेहानेन कामाच्या ओझ्यामुळे थकला असेल आणि सुटी घेऊन काही दिवस मॉस्कोला जाऊन राहिल्यास त्याचा शीण नाहीसा होण्याची शक्यता आहे, असा विचार एबेलने बोलून दाखविला. मॉस्कोने या योजनेला मान्यता दिली, इतकेच नव्हे तर हेहानेनला बढतीही दिली. हेहानेनच्या प्रवासाची सारी योजना एबेलने आखली. लौरी आर्नेल्डि एर्मास या नावाने हेहानेन पॅरीसमार्गे मॉस्कोला जाणार होता. एबेलचा साक्षेपीपणा इतका परिपूर्ण होता की पॅरीसला उतरल्यावर रशियन दूतावासामध्ये फोन कसा करायचा तेदेखील त्याने हेहानेनला पढवून ठेवले होते. अचानक मंजूर केलेली रजा आणि मिळालेली बढती यांमुळे हेहानेनला संशय वाटू लागला. आपण केलेल्या कामगिरीचे बक्षीस घेण्यासाठी नव्हे तर बहुधा त्याबद्दल शासन भोगण्यासाठीच आपल्याला मॉस्कोला पाठवले जात आहे, असे त्याच्या मनाने घेतले. त्याची भीती अर्थातच अनाठायी नव्हती. आधी जानेवारी महिन्यात हेहानेन निघणार होता, परंतु काहीतरी सबब काढून त्याने जाणे रद्द केले. फब्रुवारीमध्ये आपल्यामागे अमेरिकन गुप्तहेरखात्याचा ससेमिरा

लागला आहे अशी कल्पित कहाणी त्याने एबलला सांगितली. परंतु एबेल या आपल्या मदतनीसाला पुरेपूर ओळखून होता. त्याने चोवीस एप्रिल एकोणिसश सत्तावन्न रोजी जबरदस्तीने हेहानेनला अमेरिका सोडायला भाग पाडले. हेहानेन पॅरीसला सुखरूप जाऊन पोहोचला. ठरल्याप्रमाणे टेलिफोन करताच एका रशियन अधिकाऱ्यान त्याची भेट घेतली. या भेटीत त्याला दोनशे डॉलर्सची प्राप्ती झाली, रशियाकडून मिळू शकणारी ही अखेरची रक्कम खिशात घालून हेहानेन दुसऱ्या दिवशी सरळ पॅरिसमधील अमेरिकन लिगेशनच्या प्रमुखासमोर जाऊन उभा राहिला आणि स्वतःला त्यांच्या स्वाधीन केले. त्याने सांगितलेल्या कथेवर प्रथम अधिकाऱ्यांचा विश्वासच बसेना. मग त्याने एक बनावट नाणे दाखवून त्याचा उपयोगदेखील स्पष्ट केला, तेव्हा कदाचित तो सत्यही सांगत असेल अशी शक्यता गृहीत धरून हेहानेनला त्यांनी न्यूयॉर्कला पाठवून दिले.

न्यूयॉर्कमध्ये गुप्तहेरखात्यात प्रथमतः मानसशास्त्रज्ञांनी हेहानेनमध्ये काही मानसिक विकृती आहे काय, याची तपासणी केली. तशी असती तर अर्थातच त्याच्या कथेला बाध आला असता, परंतु त्यांनी केलेल्या विविध परीक्षांतून असे सिद्ध झाले की तो व्यसनी आणि आत्मघाताला प्रवृत्त होणारा इसम आहे. हा निर्णयदेखील त्याच्या कथेची विश्वसनीयता वाढवणारा नव्हता. परंतु जेव्हा त्याने काही सांकेतिक संदेश उलगडून दाखवले तेव्हा मात्र त्याच्या निवेदनाचा गांभीर्याने विचार करणे क्रमप्राप्त झाले. यथाकाल एबेलला अटक झाली.

## भिन्न प्रकृतीचे हेर

एबेल आणि हेहानेन यांच्याइतके भिन्न प्रकृतीचे दोन हेर क्वचितच सापडले असते. एबेल चलाख आणि व्यवस्थित होता; हेहानेन मंद आणि निष्काळजी होता. एकाने आपल्याला या व्यवसायाला वाहून घतले होते; दुसरा मात्र संधिसाधू होता. एक उंच आणि सडपातळ होता; दुसरा बुटका आणि जाडगेला होता. एक विरागी तर दुसरा उपभोगी होता. रशियन वाङमयामध्ये आढळणाऱ्या लाचखाऊ आणि प्रामाणिक सनदी नोकरांतील विरोधच एबेल आणि हेहानेन यांच्या रूपाने साकार झाला होता.

खटल्याच्या वेळी डोनोवनने हेहानेनबद्दल पुढील उद्गार काढले होते : " हेहानेनच्या संदर्भात इतिहासाला असं नमूद करावं लागेल की कोणत्याही देशाने कसल्याही कामगिरीकरता इतका वेंधळा, भेकड, निर्लज्ज आणि बेजबाबदार हेर कधीही पाठवला नसेल. रशियन गुप्तहेरखात्यात त्याला एवढा मोठा हुद्दा कसा मिळाला हे एक कोडंच आहे. या माणसाला अमेरिकेची अत्यंत गुप्त संरक्षणविषयक गुपितं मिळवण्याची कामगिरी सांगितली होती, यावर विश्वास बसत नाही. "

एबेलच्या अटकेचे वृत्त अल्पावधीतच सर्वतोमुखी झाले. सर्वांत अधिक आश्चर्याचा धक्का जर कोणाला बसला असेल तर तो त्याच्या छोट्याशा मित्रमंडळाला.



**बातम्या ऐकत असतानाच......**

एबेलच्या हातून अशी कोणतीही कृती झाली नव्हती वा तोंडून असा शब्द गेला नव्हता की ज्यामुळे त्याचा कोणाला संशय यावा. त्या मित्रमंडळाच्या लेखी एबेल हा मूळचा जर्मन असलेला, सौम्य स्वभावाचा, अभ्यासू वृत्तीचा एक सामान्य चित्रकार एमिल गोल्डफुस होता !

त्याचे खरे स्वरूप उघड झाले तेव्हा मात्र त्याच्या मागील साध्या बोलण्यामध्ये आणि सर्वसामान्य वागण्यामध्येदेखील वेगळा अर्थ शोधला जाऊ लागला. एबेलचा स्टुडिओ असलेल्या बिल्डिगमध्येच टेलिव्हिजन दुरुस्त करण्याचे एक दुकान होते. एबेलच्या शॉर्ट–वेव्ह ट्रान्समिशनची माहिती कळल्यावर भोवतालच्या परिसरातून टेलिव्हिजनवर चमत्कारिक अडथळे येत असल्याच्या गिऱ्हाईकांच्या तक्रारींचे स्मरण त्या दुकानदाराला झाले. रात्री दहा वाजता मॉस्कोशी संपर्क साधण्यासाठी जिन्यावरून आपल्या खोलीकडे जाणाऱ्या एबेलची हमखास एका चित्रकाराशी गाठ पडे. एकदा त्या चित्रकाराने एबेलला विचारले होते, " इतक्या उशिरापर्यंत कशाला चित्र काढत बसतोस तू ! " त्यावर एबेलने उत्तर दिले होते, " दिवसभर मी फार कामात असतो. त्यामुळं चित्रे रात्री करण्यापलीकडे इलाजच उरत नाही. "

बिल्डिंगमधील सगळ्यांनाच एबेलबद्दल आस्था वाटत असे. कारण त्याच्या वागण्यात शिष्टपणा यत्किंचित नव्हता. प्रत्येकाशी स्नेहाने वागण्याचा तो कटाक्षाने प्रयत्न करत असे. प्रत्येकाशी म्हणजे अगदी लिफ्ट चालवणाऱ्या माणसाशीसुद्धा. कधी कधी तर तो त्याला मद्यपानाला घेऊन जाई. एकदा तर लिफ्ट बंद पडली असता अगदी अल्पावधीत स्वतःच्या उपकरणांच्या साहाय्याने एबेलने ती दुरुस्त करून दिली होती.

ओव्हिंग्टन स्टुडिओ येथे एबेलने आपला मुख्य तळ ठोकला होता. त्याला बरीच कारणे होती. त्याचे भाडे अगदी अल्प होते. पाचव्या मजल्यावरील त्याच्या खोलीतून मॉस्कोशी संपर्क साधणेदेखील सोयीचे होते. शिवाय त्याच्या राहत्या जागेपासून हे ठिकाण दूर होते. त्यामुळे संशयाची शक्यता कमी झाली होती. पण या सर्वांपेक्षा चित्रकाराच्या भूमिकेचा लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यास त्याला फार मोठा उपयोग झाला. अर्थात चित्रकाराची भूमिका करताना त्याला फारसा 'अभिनय' करावा लागलाच नाही. कारण चित्रकला त्याच्या बोटांत होतीच. त्याची चित्रे पाहून टीकाकारांनी तो एक हुशार आणि होतकरू चित्रकार आहे असा निर्वाळा दिला होता. एबेलसारखा बहुविध कर्तृत्व असलेला माणूस भाषाशिक्षक, छायाचित्रकार, इलेक्ट्रिशियन आणि आणखी कितीतरी उद्योग सहज करू शकला असता. चित्र काढण्याची त्याला खरी खरी आवड होती. शिवाय त्यामुळे पुष्कळ गोष्टी अनायासे साधत होत्या. चित्रकाराच्या अनियमित वागण्याचे कोणालाही आश्चर्य वाटत नाही. शिवाय परस्परांच्या खाजगी वर्तणुकीबद्दल चित्रकारांच्या वर्तुळात फारशी चौकसबुद्धी दाखवली जात नाही. दिवसानुदिवस एखाद्या चित्रकाराबरोबर गप्पा मारल्या तरी आपण कोठे राहतो, आपल्या कुटुंबाची हालहवाल काय आहे, आपण मूळ कोठचे असले प्रश्न विचारले जाण्याची शक्यता नसते. खाजगी जीवनाबद्दल पृच्छा न करणे हा चित्रकारांमधील एक अभिमत संकेत आहे. एबेलच्या तो चांगलाच पथ्यावर पडला.

या संदर्भात एक बोलकी गोष्ट सांगण्यासारखी आहे. एके दिवशी बर्ट सिल्व्हरमन हा एबेलचा शेजारी दोस्त त्याच्या स्टुडिओत शिरला. एबेल त्या वेळी मॉस्कोहून रशियन भाषेत दिल्या जाणाऱ्या काही सूचना ऐकत होता. सिल्व्हरमनला पाहताच एबेलने रेडिओ बंद केला आणि त्याच्याबरोबर तो आपल्या स्टुडियोमध्ये आला. इतक्यात टेलिफोनची घंटा वाजली. सिल्व्हरमनने टेलिफोन उचलला आणि सहज म्हटलें, "मी एमिलबरोबर बसलोय इथं. आणि आम्ही दोघे त्याच्या शॉर्टवेव्ह रेडिओवर मॉस्कोहून येणाऱ्या वार्ता ऐकतो आहोत!" एबेलने त्याला दटावीत सावकाश म्हटले, "कृपा करून पुन्हा कधीही या गोष्टीचा उल्लेख करू नकोस." सिल्व्हरमनला स्वतःला या गोष्टीत कसलेच वैलक्षण्य दिसले नव्हते. ओव्हिंग्टन स्टुडिओमधील एक मनमिळाऊ चित्रकार रशियन हेर असेल ही गोष्ट इतकी अशक्य कोटीतील होती की एबेल[illegible] [illegible]रळ सरळ कबुलीजबाब दिला असता तरच कोणाचा त्यावर विश्वास बसल[illegible] नसता. फ्रान्स फेलिक्स नावाच्या एका चित्रकाराशी सिल्व्हरमनमुळे एबेलची ओळख झाली होती. एबेलला अटक झाल्यानंतर तो उद्गारला, "ज्या वेळी वर्तमानपत्रांत मी माझ्या डोळ्यांनी ती बातमी वाचली त्या वेळी, आपण लोकशाहीमध्ये राहतो आहोत असा विश्वास बाळगणाऱ्या एखाद्या नागरिकाला कोणीतरी सांगावे की, 'अरे बाबा ही लोकशाही

नाही, राजेशाही आहे ' म्हणजे त्याला जसा धक्का बसेल तसाच धक्का मला बसला. "

## एबेलचे दोन अवतार

सिल्व्हरमन तर त्या बातमीने हबकूनच गेला. त्याचा मित्र एमिल गोल्डफुस विरून गेला होता; आणि त्याच्या जागी एक रशियन हेर साकार झाला होता. या व्यक्तीशी सिल्व्हरमनचा परिचय नव्हता. एकोणिसशे सत्तावन्न साली आपल्या लग्नाला हजर राहून एक अत्यंत सुरेख भेटवस्तू देणारा एबेल हाच माणूस होता काय ? आपण केलेल्या ज्या पोर्ट्रेटमध्यें त्या माणसाची बुद्धिमत्ता आणि स्वभाव व्यक्त झाला आहे आणि ज्याला आपण ' एक हौशी कलावंत ' असे नाव दिले ते पोर्ट्रेट करताना आपल्यासमोर हाच एबेल बसला होता काय ? याच एबेलबरोबर आपण दूरदूरच्या सहली केल्या होत्या काय ? असा विचार मनात येऊन सिल्व्हरमन व्याकुळ होई. त्याचा एक जिवाभावाचा दोस्त हरपला होता. त्या संदर्भात तो म्हणाला, " एखाद्या मित्राचा मृत्युमुळं वियोग होणं ही एक गोष्ट. परंतु तो खरोखर भलताच कोणी तरी आहे असा शोध लागून तो दुरावणं ही गोष्ट दुःखद आहे इतकंच नव्हे तर खचवणारी आहे. "

आपल्या अत्यंत काटेकोर स्वभावामुळे एबेलने आपल्या आयुष्याचे व्यवस्थित कप्पे पाडले होते. बर्ट सिल्व्हरमन, अॅलन विन्स्टन आणि डेव्हिड लेविन या तिघांशी त्याची मैत्री होती. त्यांच्याबद्दल एबेलला खरोखरच आपुलकी वाटे. अनेक प्रसंगी ही आपुलकी त्याने व्यक्त केली होती. ज्या वेळी तो आपल्या रहस्यमय दौऱ्यावर निघे त्या वेळीदेखील आपल्याला हवाबदल करण्याची गरज कशी आहे, हे तो आपल्या मित्रांना समजावून सांगे. त्याचा खुलासा नेहमी पटण्यासारखा असे. त्याला कायम सर्दीचा विकार होता. त्यांना माहीत असलेला एबेलचा एमिल गोल्डफुस हा अवतार खऱ्याखुऱ्या माणसाचाच एक भाग होता. त्याचा दुसरा अवतार प्रकट झाल्यावर मात्र त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. आंधळे आणि हत्ती या गोष्टीतील आंधळ्यांसारखी त्यांची स्थिती एबेलच्या बाबतीत इतके दिवस झाली होती.

## बुद्धिमत्ता आणि रसिकता

एबेलने त्या साऱ्यांना एकच कहाणी सांगितली होती. आपण मूळचे जर्मन असून छायाचित्रणाच्या व्यवसायात न्यूयॉर्क व बॉस्टन येथे अनेक वर्षे काढली; त्यात कमावलेल्या पैशांनी चित्रकारीचा छंद आजन्म करता येण्यासारखी परिस्थिती होती. शिवाय त्याला कसलेच पाश नव्हते. " तू लग्न का केलं नाहीस ?" या सिल्व्हरमनने विचारलेल्या प्रश्नाला त्याने " बायकांना केवळ लग्नाशिवाय दुसऱ्या गोष्टीही हव्या असतात. " असे गूढ भासणारे उत्तर दिले होते. मात्र स्त्रियांविषयी त्याने वारंवार अविश्वास दाखवला तरी त्याला स्त्रिया आवडायच्या, असे त्याच्या मित्रांच्या लक्षात आले होते. रस्त्यातून जाणाऱ्या-येणाऱ्या स्त्रियांतून देखणी स्त्री त्याला अचूक

दिसायची आणि तिच्या सौंदर्याचे तो रसिकतेने विश्लेषण करायचा. ग्लॅडिस नावाच्या कोणा स्त्रीकडून आलेले एक पत्रदेखील त्याच्या स्टुडिओत सापडले होते.

परंतु मूलत: तो परंपरा आणि सामाजिक संकेत व नीतिमूल्ये मानणारा होता. एकाच वेळी अनेक प्रेमप्रकरणे रंगवणाऱ्या विन्स्टनला एबेल पुन्हा पुन्हा एकनिष्ठेची महती सांगत असे. तो चावट चित्रपट बघतो म्हणून त्याला रागे भरत असे.

एबेलला विविध विषयांत गती होती. परंतु आपण कसलेही पद्धतशीर शिक्षण घेतले नाही, असा त्याचा दावा होता. तो भरपूर वाचत असे, आणि एका मित्राच्या मते तर एबेलला माहीत नाही अशी गोष्टच अस्तित्वात नव्हती ! जे माहीत नाही ते तत्परतेने शिकण्याची त्याची तयारी होती. एखाद्याने तुमच्याकडून बुद्धिबळे शिकून घ्यावीत आणि दोन आठवड्यांत तुमच्यावर मात करावी, तशी एबेलची धारणाशक्ती होती. चित्रकलेतील एखादी तांत्रिक गोष्ट विन्स्टनने त्याला सांगितली की त्याचे कुतूहल चाळवले जायचे. मग भाराभर ग्रंथ वाचून त्या गोष्टीची समग्र माहिती तो मिळवायचा, इतकेच नव्हे तर त्या दृष्टीने प्रयोगही करायचा. गणित-शास्त्राचे तर एबेलला वेडच होते. त्याचे मित्र या विषयात त्याला साथ द्यायला असमर्थ होते. मग तो एकाकीपणे व्यासंग करायचा आणि मित्रांना उत्साहाने पुस्तके वाचायला द्यायचा ! मित्रदेखील धोरणीपणाने तो आवडल्याचे आवर्जून सांगण्यास चुकत नसत.

एबेल अमेरिकन माणसासारखा नव्हे तर युरोपियन माणसासारखा बोलतो, वागतो याचे त्याच्या मित्रमंडळींना फारसे आश्चर्य कधीच वाटले नाही. कारण त्यांच्यापैकी बहुतेकांच्या बोलण्यात वेगळा ढंग होता आणि बहुतेकांचे वंशमूळही युरोपियन होते.

## आदर कमी झाला नाही !

आपल्या चित्रकलेबद्दल एबेलला अभिमान होता. एखाद्याचा सभ्य उपदेश तो ऐकून घेई, पण परखड टीकेने मात्र तो अस्वस्थ होई. जसा कोणी एबेलच्या चित्रांचा विशेष गौरव केला नाही तसेच टाकाऊ म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणेही सहसा कोणाला शक्य झाले नाही. कारण त्या चित्रांना स्वत:चे असे खास रूप होते ! एका समृद्ध व्यक्तिमत्वाची ती निर्मिती होती. सिल्व्हरमनने एबेलचे जे पोर्ट्रेट तयार केले होते त्याला 'एक हौशी कलावंत' असे नाव त्याने दिले होते. एबेलच्या पोर्ट्रेटला ते नाव शोभत नव्हते. मुरब्बी, मातबर चित्रकार होणे हा एबेलच्या बाबतीत फक्त कालावधीचा प्रश्न होता. एके दिवशी आंद्रे सेगोव्हिया या अभिजात गिटारवादकाने बाखच्या काही रचना सादर केलेल्या एबेलने ऐकल्या. आणि त्याला गिटार शिकण्याची, त्यावर बाखच्या रचना वाजवण्याची स्फूर्ती झाली. नंतरचे काही महिने तो याच तळमळीने पछाडलेला होता, अखेर त्याने खरोखरच गिटारवादनात नैपुण्य संपादन केले.

वादविवाद, विशेषत: राजकारणावरचे वादविवाद, एबेल टाळत असे. 'राजकारण हा राजकारण्यांचा विषय आहे. त्याचं काय बरं-वाईट करायचं ते त्यांना करू द्या.' असे तो म्हणायचा, रेम्ब्राँ आणि व्हेरमीअर हे त्याचे आवडते चित्रकार होते. नवचित्रकलेचा तिटकारा होता त्याला. 'झाडाचं चित्र काढून ते दुसरं कसलं तरी आहे असं दाखवण्याचा' नवचित्रकलेचा प्रयत्न त्याला हास्यास्पद वाटे. त्या प्रयत्नावर टीका करताना 'घड्याळदुरुस्तीसाठी चांभाराकडे जाऊन चालत नाही' असे सूत्र तो तोंडावर फकायचा. खुशीत असला म्हणजे विन्स्टनच्या सहवासात मद्यपान करून एबेल तारस्वरात लोकप्रिय जर्मन गीते गायचा आणि गाता गाता विन्स्टनच्या आवाजाची थट्टा करायचा.

एबेलचे खरे स्वरूप प्रकट झाल्यावर त्याच्या मित्रांची अवस्था मोठी कठीण झाली. त्यांचाही संबंध एबेलशी जोडण्यात आला. वर्तमानपत्रवाले आणि टेलिव्हिजनवाले यांनी त्यांच्यावर मुळी पहाराच ठेवला आणि त्यांना मोकळेपणी जगणे अशक्य करून टाकले. एबेलशी अगदी दूरचा संबंध असलेल्या व्यक्तींचीदेखील अमेरिकन गुप्तहेरखात्याने कसून उलटतपासणी घेतली. 'ज्या ठिकाणी तो रशियन राहात असे ते ठिकाण' अशी ओव्हिंग्टन स्टुडिओची कुविख्याती झाली. त्याचा परिणाम होऊन एबेलच्या मित्रांना आपले स्टुडिओज तेथून हलवावे लागले. मालकाला नवीन भाडेकरू मिळणे कठीण होऊन बसले.

एवढी ससेहोलपट झाली तरी मित्रांचा एबेलबद्दलचा आदर कमी झाला नाही. कारण या साऱ्या गोष्टींचा विसर पडावा इतके एबेलचे व्यक्तिमत्त्व संपन्न होते. शास्त्र आणि कला यांत सारख्याच पारंगत असलेल्या काही मोजक्या लोकांत एबेलची गणना होऊ शकली असती. तो कुशल चित्रकार होता. व्यासंगी वादक होता. उत्कृष्ट छायाचित्रकार होता. त्याचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. गणित, रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञान यांत त्याला असामान्य गती होती. करमणुकीसाठी आईन्स्टाईन वाचणारा, कॅलक्युलसचे प्रश्न सोडवणारा आणि 'संडे टाईम्स'मधील शब्दकोडे एका तासात सोडवू शकणारा दुर्मिळ माणूस होता तो!

त्याच्या स्टुडिओत डझनावारी पुस्तके सापडली. त्यांत रहस्यकथा होत्या तशी एलेमेन्ट्स ऑफ सिंबॉलिक लॉजिक, बुक क्रिप्टोॲनॅलिसिस–ए स्टडी ऑफ सायफर्स ॲंड देअर सोल्युशन, दी लॅंग्वेज ऑफ सायन्स, हाऊ टु रन ए लेथ, अशीही पुस्तके होती. '–कला वेगळी, राजकारण वेगळे' अशा शीर्षकाची एक पुस्तिकाही त्याने लिहिली होती.

एबेल सुतारकामात प्रवीण होता. त्याने मित्रांना अनेक वस्तू तयार करून दिल्या होत्या. व्हिक्टर ह्यूगोच्या 'ले मिझराब्ल' या कादंबरीचा तुरुंगात पडलेला नायक नाण्यात दडवलेल्या कानशीचा उपयोग करून पळून जातो, या संदर्भावरूनच आपल्याला संदेशवाही बनावट नाण्यांची कल्पना सुचली असे त्याने डोनोवनला

सांगितले होते. हे सारे पाहिले म्हणजे एबेलच्या ज्ञानलालसेबद्दल आदर वाटल्यावाचून राहत नाही.

## देशप्रीतीचा पाईक

एबेल स्वत: मार्क्सिस्ट विचारसरणीचा कडवा पुरस्कर्ता नव्हता, अशी डोनोवनची खात्री झाली होती. कदाचित तो कम्युनिस्ट पक्षाचा साधा सभासदही नसेल. ( हेहानेन मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला होता.) राजकारणाचा आणि कलावंताचा संबंध नसावा असे एमिल गोल्डफुसचे मत होते. रुडॉल्फ आयव्हॅनोव्हिच एबेल या धंदेवाईक हेराचेदेखील तसेच मत असावे. असे असताही त्याने हेरगिरीची जोखमीची जबाबदारी पत्करली याचे कारण राजकारणाच्या पलीकडे जाणाऱ्या त्याच्या ज्वलंत देशप्रीतीत सापडू शकेल. परंतु बहुतेक निरीक्षकांनी, त्याने हेरगिरी आपल्या कुटुंबासाठी वा पैशासाठी वा साहसप्रीतीसाठी वा गौरवासाठी केली, अशी कारणमीमांसा केली. त्यावर भाष्य करताना डोनोवनने पुढील मार्मिक उद्‌गार काढले, "आपण ज्वलन्त देशाभिमानाला इतके पारखे झालो आहो, की ज्यांचे स्पष्टीकरण देणे शक्य आहे. अशाच कारणांचा विचार एबेलच्या प्रकरणात आपण केला. एबेलने देशप्रेमाने प्रेरित होऊन ही कामगिरी पत्करली असेल हा सरळ विचार कोणाला सुचू नये ही आमच्या समाजजीवनाची विकृती नव्हे काय ?"

उदात्त देशप्रीतीने भारल्यामुळे एबेलने अमेरिकेत हेरगिरी करण्याचे जीवघेणे काम पत्करले आणि जाहीर उच्चाराने त्या गूढ प्रीतीची विटंबना होईल म्हणूनच त्याने पकडल्यानंतर एक शब्दही न उच्चारण्याचा निर्णय घेतला असावा. देशप्रीतीच्या त्या वीरोदात्त पाईकापुढे नतमस्तक झालेला डोनोवन हा तुमचा–माझा प्रतिनिधी नव्हे काय ?

स मा प्त

२१ डिसेंबर १९६८

मुंबई समाचार — — — — — — — — — — — — — — पृष्ठ १७ वरून
भवनाच्या त्रिदशकपूर्ती समारंभाच्या व्यासपीठावरून बोलताना आवेषाने मांडत होते. अलीकडल्या सांस्कृतिक चळवळींमध्ये व भारतीय संस्कृतीची जोपासना करणाऱ्यांमध्ये भवनाचा व भवनाचे 'सर्वकाही' श्री. मुन्शी यांचा वाटा बराच मोठा आहे. तीस वर्षांपूर्वी एक ध्येय उराशी घेऊन, अगदी लहानशी सुरुवात करणाऱ्या या संस्थेचा पसारा आज बराच वाढला आहे. 'भवन्स'च्या शैक्षणिक संस्थांतून आज जवळ जवळ अकरा हजार विद्यार्थी आपापला अभ्यासक्रम पुरा करीत आहेत, तर सोळाशेच्या आसपास शिक्षकवर्ग भवनाजवळ आहे. ह्या व्यतिरिक्त भवनातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या संस्कृत व गीतेच्या परीक्षांना साठ हजारांच्या आसपास विद्यार्थी बसतात. साहित्यिक क्षेत्रात, 'भवन्स जर्नल' (इंग्लिश) व 'समर्पण' (गुजराती) ह्या दोन पाक्षिक मुखपत्रांव्यतिरिक्त इतर अनेक पुस्तके भवनातर्फे वेळोवेळी प्रकाशित करण्यात येतात. ह्यातली बहुसंख्य पुस्तके, प्राचीन भारतीय संस्कृती, गीता, महाभारत, रामायण, वेद आदींची ओळख करून देणारी असतात. भवनाची आठ केन्द्रे देशभर विखुरलेली असून त्यांच्यामार्फतही भारतीय जनमानसात भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांची ओळख पटवून द्यायचे कार्य अव्याहत चालू असते.

भवनाचे केंद्र कार्यालय मुंबईत असूनही दुर्दैवाने, मुंबईबाहेर महाराष्ट्रात भवनाविषयी फारशी माहिती कुणाला नाही. कदाचित् विभिन्न सांस्कृतिक चळवळींचे महाराष्ट्र माहेर असल्याने व त्यागी, समर्पित जीवनाची एक परंपरा महाराष्ट्रात असल्याने असे असेलही; पण महाराष्ट्रात, भवनाच्या कार्याचे लोण फारसे पसरलेले नाही हेही तितकेच खरे! ते तसे पसरणे, भवनाच्या कार्याचा मराठीत गोषवारा असणे व त्याची शाखा मुंबईबाहेर महाराष्ट्रात असणे अवश्य आहे!

भवनाच्या ह्या त्रिदशकपूर्ती समारंभात भारताचे माजी राष्ट्रपती व अर्वाचीन कालातले भारतीय संस्कृतीचे महान भाष्यकार, डॉ. राधाकृष्णन ह्यांना भवनाची "ब्रह्मविद्या भास्कर" ही सर्वोच्च पदवी देण्यात आली तर श्री. निजलिंगप्पा, कै. दिवेटिया व श्रीमती सुब्बलक्ष्मी ह्यांना ताम्रपत्र अर्पण करण्यात येऊन भवनाचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात आले.

महत्त्वाच्या भाषणात श्री. मुन्शींनी धार्मिक शिक्षणाच्या व संस्कृतच्या आवश्यकतेवर भर दिला. राष्ट्रपती डॉ. हुसेन ह्यांनी अध्यक्षपदावरून बोलताना "विज्ञान आणि अध्यात्म ह्यांची परस्परपूरक सांगड घालण्याच्या आवश्यकते"वर भर दिला! कदाचित् विज्ञान व धर्म-अध्यात्म ह्यांचा अतिरेकी पक्षपात करणाऱ्यांना राष्ट्रपतींनी हा सुवर्णमध्य दाखवून दिला असेच म्हणावे लागेल. विज्ञानाची निरंतर आवश्यकता व त्याचे सामर्थ्य कोणीही नाकारणार नाही; पण त्याचबरोबर विज्ञानाच्या शापांना आवरण्यासाठी काही शाश्वत, नैतिक, आध्यात्मिक मूल्यांची जोपासना होणेही आवश्यक आहे व त्याचसाठी धार्मिक शिक्षण व सांस्कृतिक चळवळीचे महत्त्व कायम आहे! ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. २१ ते २७ डिसेंबरचे राशी-भविष्य

**मेष** : सातवा मंगळ म्हणजे प्रगतीच्या मार्गात अडचणी. साडेसातीत असे काही घडले की, मन कच खाते, वाटचाल मंदावते आणि पर्यायाने या गोष्टींचा आपल्या यशावरही परिणाम जाणवू लागतो.

या वेळी रवि-बुध भाग्यस्थानातून जात आहेत एवढाच एक दिलासा. तुमच्या धावपळ-धडपडीला थोडेफार यश येईल.

क्षुल्लकशा गोष्टीवरूनही पराचा कावळा होऊ लागेल, व्यावसायिक संघर्ष वाढू लागतील. शेजाऱ्यापाजाऱ्यांची सहानुभूती आटू लागेल. प्रत्येक पाऊल विचाराने टाकलेत तरच आनवस्था प्रसंग टळेल. प्रकृतीलाही काही काळ जपावे लागेल.

दि. २३ ते २५ हाती चांगला पैसा यावा.

**वृषभ** : आजच शनी मार्गी होत आहे. गेल्या ४।६ महिन्यांतील साऱ्या स्थगित कार्यांना आता गती मिळू लागेल.

हा आठवडा खूपच धावपळीचा, घाईगर्दीचा जाणवेल. अनेक कार्यक्रम यशस्वी करून दाखवावे लागतील. थोरामोठ्यांचे सहकार्य घेऊन नवा व्यवसाय उभारावा लागेल. राजकीय क्षेत्रातही उच्च स्थान भूषविण्याची संधी लाभेल.

नव्या घराच्या योजना या आठवड्यापासूनच आकार घेऊ लागतील, व्यवसाय-धंद्याचा व्यापविस्तार वाढवण्याकडे लक्ष पुरवावे लागेल.

महत्त्वाची पत्रे येतील. आनंदाची बातमी कळेल.

दि. २४ ते २७ या कालावर अधिक लक्ष केंद्रित करा.

**मिथुन** : चौथ्या मंगळाचा नैराश्यपूर्ण काल आता इतिहासजमा झाला आहे. नव्या आशा, अभिनव योजना घेऊन भविष्यकाळाची वाटचाल करू लागाल. कोणत्याही कामात माघार घेण्याची आता पाळी येणार नाही.

पैशाचा प्रश्न सुटेल, नोकरीधंद्यासाठी केलेले परिश्रम सत्कारणी लागतील. कोणत्याही क्षणी इष्टमित्रांचे साहाय्य लाभेल आणि त्यामुळे तुमची पावले वेगाने प्रगतीकडे पडू लागतील.

प्रयत्नांची शर्थ केलीत तर कला-क्रीडा क्षेत्रात विक्रम करून दाखवाल.

मुलाबाळांच्या जीवनात विशेष आनंदाच्या घटना घडून याव्यात.

दि. २२ ते २५ विशेष यश देणारा काल.

**कर्क** : चौथा मंगळ सुरू झालेला आहे. हा काल फारसा स्वास्थ्याचा असत नाही. तुमचा पिंडच मुळी आघात सोशीत सोशीत पुढे पुढे जाण्याचा. आता माघार नाही. यापुढेही कधी नाही. गुरूचे सामर्थ्य पाठीशी आहे. तुमच्या प्रयत्नांच्या कक्षा विस्तारल्या जातील, नव्या क्षेत्रात निर्धाराने पाऊल टाकले जाईल, आपणांस या अनिष्ट कालीही यश मिळेल—प्रयत्नांची शर्थ करून.

या आठवड्यात नवे कार्यक्रम हाती घ्याल. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील, गरज भासेल फक्त साहसाची.

कलासाहित्याच्या क्षेत्रात तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. स्थानांतरामुळे तुमचे अनेक प्रश्न भराभर सुटू शकतील.

दि. २५ ते २७ काही गोष्टींत अपेक्षेबाहेर यश मिळेल.

**सिंह** : शनि-राहूसारखे भयंकर ग्रह आठवे असतानासुद्धा तुम्ही आपले महत्त्व आणि माहात्म्य अबाधित राखलेत यातच तुमच्यातील कर्तृत्वाचे दर्शन घडते. आतातर गुरू धनस्थानी आणि मंगळ पराक्रमस्थानी ही आत्यंतिक अनुकूल ग्रहस्थिती आपणांस लाभलेली असल्यामुळे आपला अनिष्ट काल आता आपण पूर्णत्वाने विसरू शकता.

प्रगतीचा पूर्वकालच हा. अनेक योजना आकार घेऊ लागतील. सांपत्तिक योग तर अपेक्षेबाहेर सुधारू लागतील. राजकीय क्षेत्रातील तुमचे ढळलेले स्थान पुन्हा तुम्ही मिळवू शकाल.

दि. २२ ते २५ या काळाची नोंद करा.

**कन्या** : गुरू पहिला, शुक्र नववा. हा गुरू-शुक्र त्रिकोणच सध्या आपल्या दैवाची जडण-घडण करीत आहे. या समर्थ ग्रहांच्या कार्यात शनि-राहू अडथळे आणण्यास धजणार नाहीत. गेल्या महिन्याभरातील संघर्ष मिटू लागतील, स्थगित कामे गती घेऊ लागतील.

लेखन—वृत्तपत्रव्यवसाय, सौंदर्यप्रसाधने अशा स्वरूपाच्या व्यवसायांत प्रगती-कडे पावले पडू लागतील, उद्योगधंद्यात नवे आकर्षक; अभिनव असे काही करून दाखवण्याची अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हावी. जवळपासच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल.

दि. २२ ते २४ या काळात अपेक्षेबाहेर यश लाभेल.

**तूळ** : मंगळाच्या राश्यंतरामुळे थोडेफार स्वास्थ्य लाभेल, अपेक्षेप्रमाणे सारे काही घडेल असे मात्र दिसत नाही.

मनात अनंत विचारांचे काहूर उठेल, नाक मुठीत धरून न झेपण्यासारख्या जबाब-दाऱ्या उचलणे भाग पडेल. नोकरीधंद्यांत तर अनेक वेळा माघार घेणे भाग पडेल.

सध्याचे वातावरण काहीसे चिडचिडल्यासारखे जाणवू लागेल. सांपत्तिक अडचणी फारशा जाणवल्या नाहीत तरी निष्कारण मनाला टोचणी लागणाऱ्या गोष्टी सतत घडू लागतील.

वादविवादापासून चार हात सदैव दूरच राहा. सामाजिक–राजकीय क्षेत्रांत तर चुकूनही पाऊल टाकू नका.

दि. २३ ते २५ काहीसे अनुकूल दिवस.

**वृश्चिक** : मंगळाचे सहकार्य मिळत नसतानाही तुमचे पाऊल पुढेच पडत आहे. गुरूचे आपणांस सर्वतोपरी सहकार्य मिळत आहे हेच याचे कारण. वाढत्या खर्चाबरोबर, प्राप्तीचे मार्गही वाढत आहेत. अनेक धनिकांचे सक्रिय साहाय्य मिळण्याची लक्षणे दिसत आहेत.

याच आठवड्यापासून नव्या व्यवसायधंद्यात पाऊल टाकण्यास उद्युक्त व्हाल. समाजातील गेलेले स्थान पुन्हा मिळविण्याच्या जिद्दीने सतत प्रयत्नशील राहाल.

नोकरीधंद्यातील आपले प्रयत्न अपेक्षेबाहेर यशस्वी ठरू लागतील.

दि. २५ ते २८ या काळी आशादायक वातावरण निर्माण व्हावे.

**धनू** : कित्येक महिन्यांनंतर थोडेफार स्वास्थ्याचे दिवस या आठवड्यापासूनच दिसू लागतील. शनी मार्गी झाला आणि मंगळ लाभस्थानी आला. त्याची सहानुभूती आता आपणांस कित्येक दिवस लाभेल.



सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील, अनारोग्याचे वातावरण निवळू लागेल, स्थावराचा, राहत्या जागेचा न सुटणारा प्रश्न भराभर सुटायला लागेल.

वरिष्ठांची कृपा, नोकरीधंद्यातील प्रतिष्ठेचे स्थान, सांपत्तिक लाभ या साऱ्या गोष्टींत अपेक्षित यश आता निश्चितच मिळावे. आजवरच्या साऱ्या अपयशावर आता पडदा पडेल.

दि. २४ ते २६ विशेष लाभाचा काल.

**मकर** : गुरू-मंगळ-शनी अंतरिक्षातील सारी ग्रहस्थिती तुम्हांला या वेळी इतकी अनुकूल आहे की, या वेळी आपण काहीही करायचे मनात आणले की, अपेक्षेप्रमाणे झालेच म्हणून समजावे.

या काली नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल पडेल, राजकीय क्षेत्र समर्थपणे हाताळले जाईल, सांपत्तिक दृष्टीने तर हा काल अधिकाधिक अनुकूल जाणवेल.

नव्या कल्पना—योजना गती घेऊ लागतील, दूरचा प्रवास घडेल, उद्योगधंद्यांत उत्क्रांती घडून येईल, समाजातील अधिकाधिक प्रतिष्ठेचे स्थान सहजासहजी लाभू शकेल.

मंगल कार्याचे निश्चित ठरेल, अनपेक्षित लाभ पदरी पडतील.

दि. २५ ते २७ अत्युत्तम काल.

**कुंभ** : मंगळ भाग्यस्थानी आला आणि तुमच्या साऱ्या समस्या सुटल्या, असाच आपणांस प्रत्यय आलेला असेल. या आठवड्यात सूर्यही लाभात. तो तुमच्या योजना यशस्वी करील.

प्रकृती, पैसा, स्वास्थ्य या सर्व बाबतींत आता आपणांस मुळीच चिंता करावी लागणार नाही.

नोकरीत बदली-बढतीचे योग दिसू लागतील. व्यवसायधंद्यांत लाभाचा उच्चांक गाठाल. तुमच्या प्रगतीचा रस्ता आता सहसा कोणी रोखू शकणार नाही. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. २४ ते २६ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**मीन** : अजूनही आपणांस चांगल्या व स्वास्थ्याच्या कालासाठी काही काळ वाट पाहावी लागणार आहे. शनी मार्गी झाल्यामुळे थोडेफार आशादायक वातावरण निर्माण होईल, पण आठवा मंगळ संपून गेल्यावरच आपला मार्ग निर्वेध, निष्कंटक बनू लागेल.

या कालात प्रकृती आणि पैसा या दोन्हीही बाबतींत सतत् सावध राहायला हवे. फार मोठ्या कामाला हात घालू नका. वाढत्या खर्चाला थोडाफार आळा घालण्याचा प्रयत्न करा.

नोकरा-चाकरांवर व इष्टमित्रांवर फारसा भरंवसा ठेवण्याचा हा काल नव्हे.

दि. २४ ते २६ काही गोष्टींत अल्पसे यश मिळावे. ○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649


# व्हो ल्गा जे व्हा ला ल हो ते

वि. स. वाळिंबे । मूल्य अठरा रुपये

'प्रस्तुत पुस्तक म्हणजे लेनिनचे कादंबरीमय चरित्र आहे. लेनिनविषयक सर्व पुस्तकांपेक्षा हे पुस्तक अपूर्व आहे. प्रत्येकाने वाचावे असेच आहे.'

'सध्याच्या रशियन राजवटीची पार्श्वभूमी आपल्याला या ग्रंथाद्वारे कळते. आपल्या सुबोध शैलीने श्री. वाळिंबे यांनी लेनिनच्या आयुष्यातील अनेक घटना येथे शब्दांकित केल्या आहेत. इतिहास व राजकारण यांच्या अभ्यासकांनाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीनेही प्रस्तुत ग्रंथ वाचनीय ठरावा.'

–रविवारची लोकसत्ता. १ डिसेंबर १९६८


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९. नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर,